वर्ष : अठरावे
ऑक्टोबर-नोव्हेंबर : २०२६
अंक : दहावा-अकरावा

मूल्य १० रुपये
पृष्ठसंख्या ६४

राजहंस ग्रंथवेध

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी
'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

असावे सदा हे ज्योतिर्मय जग ।
सृजनाची धग अखंडित ।।
काळाच्याही पार जाऊया चालत ।
द्रष्ट्यांची संगत धरुनिया ।।
दिवा अंतरीचा राहावा तेवत ।
भूपाळी ही गात शतकाची ।।
अष्टांगी भिजून शारदीय कळा ।
आपुल्या भाळा झळाळेल ।।

ही आहे एक भन्नाट, रहस्यमय कादंबरी ! तिरुवनंतपुरम येथील पद्मनाभ स्वामी मंदिरातील अफाट संपत्ती, त्यामागचं अनेक स्तरांवरलं राजकारण इ. वास्तव घटनेचं कथाबीज घेऊन विशाल कॅनव्हासवर फुलत गेलेली, क्षणोक्षणी उत्कंठावर्धक होत गेलेली आणि रहस्यांचा शिताफीने उलगडा करणारी ही कादंबरी....!

मूळ लेखक : रवि सुब्रह्मण्यन
अनुवाद : शिरीष सहस्त्रबुद्धे

ग्रंथप्रेमींच्या स्नेहसंवादासाठी 'राजहंस' प्रकाशनाचे व्यासपीठ

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू ॥
शब्दनि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥
संत तुकाराम

राजहंस ग्रंथवेध

संपादक :
डॉ. सदानंद बोरसे

सल्लागार संपादक :
विनया खडपेकर

कार्यकारी संपादक :
डॉ. प्रिया निघोजकर

संपादन साहाय्य :
विनायक पणशीकर
नरेश सबजीवाले
शुभांगी देशपांडे
डॉ. उमेश करंबेळकर
पंकज क्षेमकल्याणी
आरती घारे

मुखपृष्ठ शीर्षकरचना :
बाबू उडुपी

बोधचित्रे :
राहुल देशपांडे

मुखपृष्ठ :
गौरव करोशी

अक्षरजुळणी :
मुग्धा दांडेकर

वर्ष अठरावे :
अंक दहावा-अकरावा
१५ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६
मूल्य : ₹ १०/-

अनुक्रम :

□ संपादकीय / ५

□ राजहंसी 'ललित'सृष्टी

१. झुळूक : मंगला गोडबोले / १०
२. हसगत : दिलीप प्रभावळकर / १४
३. चौकात उधळले मोती : अंबरीश मिश्र / २०
४. बिटविन द लाईन्स : चंद्रमोहन कुलकर्णी / २२
५. एका रानवेड्याची शोधयात्रा : कृष्णमेघ कुंटे / २६
६. राग दरबारी : शोभा बोंद्रे / ३०
७. चंदेरी-सोनेरी : विलास शेळके / ३४
८. हिरवी पोर्ट्रेट्स : पुरुषोत्तम बेर्डे / ४०
९. सो कुल...टेक २ : सोनाली कुलकर्णी / ४६
१०. एक उलट...एक सुलट भाग २ : अमृता सुभाष / ५०
११. गोंदणखुणा : डॉ. प्रिया निघोजकर / ५४
१२. शब्दांजली : डॉ. प्रियदर्शिनी परांजपे / ५८

□ मुखपृष्ठ कविता : डॉ. प्रिया निघोजकर

हा दिवाळी अंक 'ललित' विशेषांक आहे. आमच्या ललितगद्य साहित्यकृतींतील काही निवडक लेख/संपादित अंश या अंकासाठी निवडले आहेत.

□ दीपावलीनिमित्त राजहंस प्रकाशन कार्यालय ९ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीत बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी.

या अंकातील लेखांमधील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.

पत्रव्यवहाराचा पत्ता : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०. फोन - (०२०) २४४७३४५९
संपादक विभाग - ७४९८७११९३०.
E-mail : rajhansgranthvedh@gmail.com ● Website : www.rajhansprakashan.com

वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके

'दक्षिणगंगा' असलेल्या गोदावरी नदीची महती सांगणारे हे वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक! तिचे भौगोलिक बारकावे, बहुराज्यीय प्रवास, सांस्कृतिक स्थानमाहात्म्य, कुंभमेळ्यासह इतर सांस्कृतिक प्रथा-परंपरा आणि त्या अनुषंगाने येणारे अर्थकारण या सर्वांच्या विस्तृत माहितीचा हा संदर्भसखा...

लोकमाता गोदावरी

चंद्रकला कुलकर्णी । एल. के. कुलकर्णी

किंमत : ₹ ७५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

चहाच्या व्यापारातून सुरू झालेल्या एका छोट्या दुकानाचं एका मोठ्या उद्योगाच्या साम्राज्यात रूपांतर होण्याच्या पाठीमागे होते अथक प्रयत्न, सहनशीलता, चातुर्य, प्रत्येक पिढीनं दिलेलं योगदान, कर्मचाऱ्यांनी दिलेली प्रामाणिक साथ आणि ग्राहकांचा विश्वास...

कॅडबरी

निकेतन तावडे

किंमत : ₹ ३८०/- । (ट.ख. स्वतंत्र)

अफाट आर्थिक उलाढाल करणारं कॉर्पोरेट जग!
इथं माणसं विकली जातात आणि खरेदी केली जातात,
पैशासह गुंतलेले असतात अनेक भलेभुरे लोक, विविध नाती!
एका अमानुष कॉर्पोरेट जगाचा वेध घेणारी,
वाचकाला खिळवून ठेवणारी ही उत्कंठावर्धक कादंबरी...
जरूर वाचावी अशी.

चित्तथरारक

हेमंत गोडसे

किंमत : ₹ ४००/- । (ट.ख. स्वतंत्र)

संपादकीय

'राजहंसी' ललितगद्य लेखन किती विविधांगी आहे याचा प्रत्यय वाचकांस त्या अक्षरवाटेवरून जाताना निश्चित येईल. व्यक्तीच्या बाह्य जगाचं वर्णन करता करता त्याच्या अंतर्मनाचं प्रतिबिंब येथे उमटलेलं दिसेल. काळ बदलतो, जीवनशैली बदलते, समाजरचना बदलते; पण माणसाच्या अनुभवांचे साजिवंत स्पंदन कायम राहते. त्या स्पंदनाला शब्दांची सुंदर किनार देणारं ललितगद्य म्हणजे मराठी साहित्याच्या प्रवाहातील सदाबहार चैतन्यमयी बेट आहे. त्याविषयीचे हे मुक्त चिंतन...

वाचकहो नमस्कार,

ऑक्टोबर-नोव्हेंबरचा आपला जोडअंक तुम्हां वाचकांसाठी खास असतो अगदी दिवाळीसारखाच! 'राजहंस'च्या विविध साहित्यदालनांपैकी एका साहित्यदालनातील निवडक साहित्यकृतींचा परिचय या निमित्ताने आम्ही आपणांस घडवत असतो. यंदा तुम्हां वाचकांसमोर साहित्यफराळ ठेवले आहे ते 'ललितगद्य' साहित्यप्रकारातील. नव्याजुन्याचा, विविध क्षेत्रातील साहित्यिकांचा सुमेळ साधत ही मेजवानी तुम्हासमोर ठेवताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. यांतून आपल्या सर्वांची दसरादिवाळी सणांची गोडी निश्चितच वाढेल असा विश्वास वाटतो.

दिवाळी हा केवळ दीपोत्सव नव्हे, तर भारतीय जीवनदृष्टीतील प्रकाश, मांगल्य, समृद्धी आणि नवचैतन्याचा उत्सव आहे. अंधार दूर सारून अंतर्बाह्य उजेडाची वाट धरावी, मनातील खिन्नता विसरून स्नेहबंध अधिक दृढ करावेत आणि नव्या आशांनी जीवन उजळून निघावे असा संदेश या प्रकाशपर्वातून आपल्याला मिळत असतो. अभ्यंगस्नान, आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या, फराळ, लक्ष्मीपूजन, भाऊबीजेसह सर्व दिनविशेष आदी परंपरांत भारतीय संस्कृतीची सौंदर्यदृष्टी आणि कुटुंबकेंद्री जीवनमूल्ये सामावलेली आहेत. दिवाळी घर उजळवतेच; पण माणसाच्या अंत:करणात आशेचा, माणुसकीचा आणि नवसंकल्पांचा दीपही प्रज्वलित करते. गोविंदाग्रज म्हणतात,

'ही जुनी दिवाळी नव्या दमाने आली
ही नवी टवटवी जुन्या जगाच्या गाली
या नव्याजुन्याच्या मंगल संगमकाली
जगी आनंदीआनंद झूल जणू घाली'

हा आनंद द्विगुणित होतो तो या पर्वकाळातील सकस साहित्यवाचनानं. दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा त्याचे द्योतक म्हणून पाहता येईल. या परंपरेला साजेसा असा आपल्या गृहपत्रिकेचा हा जोडअंक वाचकांच्या हाती द्यावा असा आमचा मानस असतो.

'राजहंस'नं आपल्या आजवरच्या अमृतमहोत्सवी साहित्यप्रकाशनाच्या वाटचालीत समाजमनाची सर्वांगांनी मशागत होईल हे निर्मितीसूत्र जपले आहे. चरित्र-आत्मचरित्र, वैचारिक साहित्याचे साहित्यसंचित वर्धिष्णु करत करत कथा, कविता, कादंबरी, ललित गद्य या अन्य साहित्यवाटाही समर्थपणे चोखाळल्या आहेत. या समृद्ध परंपरेत ललितगद्याला एक स्वतंत्र, संवेदनशील स्थान लाभले आहे. मानवीजीवनाच्या सूक्ष्म छटांना शब्दरूप देणाऱ्या, तसेच अनुभव, स्मृती, निसर्गघटितं, संस्कृती, व्यक्तिमनांचा भावप्रवास, परस्पर नातेसंबंधांची वीण, सामाजिक वास्तव आणि अंतर्मनातील तरल स्पंदने यांचं कलात्मक दर्शन घडवणाऱ्या ललितगद्यांनी 'राजहंसी' साहित्यदालन समृद्ध होत आले आहे आणि आजही होत आहे. त्यांत जसे भावप्रधान विचार आहेत, तसंच जीवनाकडे सौंदर्यदृष्टीनं पाहणाऱ्या संवेदनशील मनांचा आविष्कारही आहे. आपल्या पूर्वसूरींचे बोट धरून, तर कधी स्वतंत्र प्रतिभेनं ललित लेखन करत हा प्रवास अखंडितपणे सुरू आहे.

मराठीतील ललितगद्याची प्राचीनता जुन्या संतवाङ्मयातील अनुभवसंपन्न गद्यपरंपरेत आणि पुढे लघुनिबंधलेखनात दडलेली दिसते. विसाव्या शतकात मात्र ललितगद्य लेखन प्रकाराला अधिक स्वतंत्र कलात्मक वळण मिळत गेले. वस्तूत: अभिव्यक्तीसाठी विविध साहित्यप्रकार असले तरी अंतर्यामी त्याचे मूलद्रव्य एकच असल्याचे आपल्या लक्षात येते. ललित लेखनाचेही तसेच दिसते. त्यांत कधी कथा कादंबऱ्यांची बीजं गवसतात, लेखकाच्या काव्यात्म संवेदनेचा प्रत्यय येतो, कधी आत्मचरित्रात्मक तपशील तर कधी प्रवासवर्णन येते. अभिव्यक्तीचा मुक्त ओघ या प्रकारात सामावलाय असे म्हणता येईल. अन्य साहित्यप्रकार समर्थपणे हाताळत ललितगद्य लेखनातूनही आपली ठळक मुद्रा उमटविलेल्या साहित्यिकांमध्ये ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, कुसुमावती देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, विजय तेंडुलकर, अनंत काणेकर, पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, व्यंकटेश माडगूळकर, इंदिरा

संत, शांता शेळके आदी उदाहरणे देता येतील. ही यादी आणखीही मोठी होऊ शकेल. या प्रतिभावंतांनी आपल्या स्वतंत्र जीवनदृष्टीनं ललितगद्याला विविध रूपं आणि समृद्ध आशय दिला आहे. साध्या प्रसंगातही सौंदर्य शोधण्याची दृष्टी दिली आहे. हीच वाट पुसत पुढच्या काळात हा लेखनप्रकार समृद्ध होत गेला. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मंगला गोडबोलेलिखित 'झुळूक', '...आणि मी' ही ललितगद्याची पुस्तकं सांगता येतील. त्यांच्या ललितगद्याची भाषा नादमधुर, चित्रमय, सूचक आणि भावस्पर्शी आहे. प्रतिमा-प्रतिके, रूपके, उपमा आणि लय यांचा संयमित वापर त्यांत केलेला आहे. आत्मीयता, चिंतनशीलता, संयमित विनोद, उपरोध, स्मरणरंजन आणि जीवनाविषयीची कुतूहलपूर्ण दृष्टी या अन्य वैशिष्ट्यांनीही त्यांचे ललितलेखन बहरलेले आहे. त्यांच्याखेरीज 'राजहंसी' ललितगद्य - साहित्यदालन विजय तेंडुलकर, सिनेनाट्य अभिनेते दिलीप प्रभावळकर, पुरुषोत्तम बेर्डे, कविता महाजन, डॉ. नीलिमा गुंडी, चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी, चित्रकार सुभाष अवचट, सिनेनाट्य अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व अमृता सुभाष अशा अनेक महत्त्वाच्या लेखक-मांदियाळीने सजले आहे याचा आम्हास अभिमान वाटतो. जाणत्या प्रकाशकीय दृष्टीचे समृद्ध, परिपक्व अनुभव 'वाणी आणि लेखणी' व 'पत्र आणि मैत्र' या दिलीप माजगावकरलिखित ललित साहित्यकृतींमधून सहजसुंदर शैलीत अक्षरबद्ध झाले आहेत. वाचकांसाठी हा एक चिंतनानुभव आहे. इतरही अनेक नवोदित ललित लेखकांच्या सकस साहित्यलेखनाने हे दालन समृद्ध होत आहे.

हे सर्व ललितलेखन किती विविधांगी आहे याचा प्रत्यय आपणांस त्या अक्षरवाटेवरून जाताना निश्चित येईल. माणसांच्या बाह्य जगाचं वर्णन करता - करता त्याच्या अंतर्मनाचे प्रतिबिंब येथे उमटले आहे. काळ बदलतो, जीवनशैली बदलते, समाजरचना बदलते; पण माणसाच्या अनुभवांचे साजिवंत स्पंदन कायम राहते. त्या स्पंदनाला शब्दांची सुंदर किनार देणारे ललितगद्य मराठी साहित्याच्या प्रवाहात सदैव हिरवेगार राहणारे एक चैतन्यमयी बेट आहे.

प्रस्तुत अंकात आपण ज्या लेखकांच्या ललित लेखांचा अथवा त्यांतील संपादित अंशाचा समावेश केला आहे, त्यांत सिनेनाट्यक्षेत्रात आपल्या अभिनयानं ज्यांची स्वतंत्र मुद्रा उमटवलीय असे दिलीप प्रभावळकर, पुरुषोत्तम बेर्डे, सोनाली कुलकर्णी आणि अमृता सुभाष यांचा समावेश आहे. अस्सल कलावंताची अभिव्यक्ती जेव्हा शब्दांकित होते, तेव्हा तिची आभा वाचकांना स्तिमित करणारी असते याचा प्रत्यय त्यांचे लेख वाचताना येईल. सिनेसृष्टीशी जवळीक असलेल्या शोभा बोंद्रे यांचं लेखनही वाचकांना प्रसन्नतेचा अनुभव देणारे आहे. यांसोबतच चित्रकार चंद्रमोहन

वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके

युनायटेड स्टेट्स, फ्रान्स, बेल्जियम आणि दक्षिण आफ्रिका या राष्ट्रांनी इस्त्रायलला आण्विक ज्ञान आणि तंत्रज्ञान मिळवण्यात गुप्तपणे कशी मदत केली? अशा अनेक प्रश्नांचा वेध घेत इस्त्रायलच्या 'मोसाद' या गुप्तचर यंत्रणेचं क्रूर जाळं छेदणाऱ्या जागल्याची कहाणी ...

मोसाद मोहिनी

विलास फडके

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. स्वतंत्र)

वि. ग. कानिटकर यांच्या अर्धशतकी साहित्यिक कारकिर्दीमधले हे काही महत्त्वाचे टप्पे. साक्षेपाने निवडलेले, संदर्भासह मांडलेले.

अक्षरछाया

विख्यात लेखक वि. ग. कानिटकर जन्मशताब्दी स्मरण

संपा. मंगला गोडबोले । निरंजन आगाशे । डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ७५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

दिलीप कुलकर्णी यांच्या 'निसर्गायण' या ४० वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या पुस्तकातील विचारांचं नेमकं काय झालं ह्याचं सिंहावलोकन आणि विश्लेषण करणारं; त्यासोबतच मानवाचा महाविनाश टाळण्यासाठी भविष्यवेधी चिंतन मांडणारं हे स्वतंत्र पुस्तक...

निसर्गायण : ४०

दिलीप कुलकर्णी

किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

कुलकर्णी यांच्या कुंचल्याच्या जादूइतकंच लेखणीतलं सत्त्व, प्रांजळ भाव हृदयस्थ होणारा आहे. सामान्य माणसांच्या लकबी, स्वभाववैशिष्ट्ये, नात्यांतील बारकावे ते जितक्या कलात्मकतेने चित्रात उतरवतात, तितक्यात सामर्थ्याने आशयघन शब्दांतून मांडतात. अंबरीश मिश्र हे या नामावलीतील आणखी एक अवलिया व्यक्तिमत्त्व. भारतीय तत्त्वज्ञान आणि लोकसंस्कृतीचे उर्दूशी असलेला भावबंध ते भावपूर्ण शैलीत मांडताना दिसतात. त्याचेच एक उदाहरण येथे वाचकांसमोर ठेवले आहे. अन्य ललित लेखही आपापले अनवट भावसौंदर्य घेऊन मूर्त झाले आहेत. येथील ललित लेखांचा वाचनप्रवास वाचकांना निश्चित आनंददायी आह; त्यासोबतच अशा प्रकारचा आनंद अखंडितपणे लाभण्यासाठी आमचे साहित्यदालन आपल्यासारख्या रसज्ञ वाचकांसाठी सदैव स्वागतशील आहे. आपल्या सर्वांनाच आस आहे ती पूर्णत्वाच्या दिशेनं एकेक पाऊल पुढं जाण्याची. कवी बी म्हणतात तसं –

'पूर्णापासून ढळलेलें जग जातें पूर्णाकडे,
लांबणं मोठी, वाट बिकट ती उतार चढ वाकडे.
आनंदाला म्लानपणा नच सौंदर्याला क्षय
स्थलाकडे त्या जाताहे हें विश्वचक्र निर्भय.

या विश्वचक्राच्या आसाचे आपण अपरिहार्यपणे एक पाते आहोत पुढे पुढे जाणारे... ते अधिक निर्भय, जाणीवसंपन्न आणि समग्रतेचा अवकाश आपल्या आत सामावू पाहणारे व्हावे यासाठी आपण धडपडू. हे वाचन आपल्या या धडपडीची भूमी होईल अशी आशा आहे.

'राजहंसी' साहित्यकृतींवरील आपले अभिप्राय, मनोगत, परीक्षण आमच्यापर्यंत वेळोवेळी नक्की पोहचवा. आपल्या अंकातून आपण त्यांस प्रसिद्धी देत असतो. या माध्यमातून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील वाचकांपर्यंत ते पोहचते. आता नव्या तंत्रयुगाच्या हातात हात गुंफून आपला अंक डिजिटल रूपातही वाचकांसमोर येतो आहे. राजहंस प्रकाशनाच्या वेबसाईटवर जाऊन आपण हे अंक वाचू शकता.

समस्त मराठीजनांस, वाचकवृंदास भारतवर्षातील सर्वांत मोठ्या असलेल्या दीपावली सणाच्या राजहंस परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा. धन्यवाद.

डॉ. प्रिया निघोजकर
कार्यकारी संपादक

झुळूक

'झुळूक' हे मंगला गोडबोले यांचं विनोदी, खुसखुशीत भाषाशैलीत लिहिलेल्या लेखांचं छोटेखानी पुस्तक. आयुष्याच्या धकाधकीत छोट्या सुखद झुळका शोधता येतात हा विश्वास लेखिकेसोबतच वाचकांनाही येथे मिळतो. ही अशीच एक झुळूक....

।। झुळूक ।। ७ ।।

'आज एक माणूस अगदी खुशीत दिसतंय. कोणी भेटलं होतं वाटतं एका माणसाला!' अशासारखी वाक्यं लहानपणी पुष्कळ कथा-कादंबऱ्यांमध्ये असायची. प्रेमात पडलेलं एक माणूस दुसऱ्या माणसाला नक्की काय काय करतं हे धड काही माहीत नसल्यानं आम्हांलाही हाच प्रेमाचा कडेलोट वाटायचा. आम्ही खूष व्हायचो. मग क्रमाक्रमानं कधी ते एक माणूस रुसायचं, कधी ते एक माणूस पायाच्या अंगठ्यानं जमीन उकरायचं, कधी ते एक माणूस नाकावर 'राग्गोबा' घेऊन 'आम्मी नै ज्जा' म्हणायचं.... शिवाजी पार्कवर एका सभेत ''एक माणूस म्हणून जगायचं असलं तर समाजवादी समाजरचनेशिवाय....'' असं काहीसं ऐकलं तेव्हा किती गोंधळून गेले होते मी? एक माणूस म्हणून रुसणं, हसणं, लाजणं वगैरे ठीक होतं– पण अख्खं जगणं? एवढं मात्र खरं, की एक माणूस म्हणून आमच्या चिमुकल्या आयुष्याच्या जवळपास फिरकलेलं ते तेवढंच माफक लडिवाळपण होतं. एरवीचं आयुष्य आजच्या तुलनेत बरंच रुक्ष होतं, बंदिस्त होतं, औपचारिक होतं, शिस्तीचं होतं. तसे तेव्हाही पडद्यावर म्हातारे कुमार, पडद्यावरच्या दमेकरी आईची पापी घेऊन ''माँऽ, मैं बी. ए. हो गया'' असं म्हणायचेच आणि त्या माउल्याही कापऱ्या आवाजात ''बी. ए. हुवा?...मेरे लाल, अब तू मर्सिडीज कब लेगा?'' असं विचारून त्याच्या ओघळलेल्या गालांचा गालगुच्चा घ्यायच्याच. पण हे सगळं असे पडद्यावर. हे प्रसंग आणखी जिवंत झाले ते रेडिओवरच्या श्रुतिकांमध्ये आणि कौटुंबिक मराठी नाटकांमध्ये! म्हणजे उदाहरणार्थ, दादाच्या रिझल्टची तार किंवा वर्तमानपत्र ताईनं हातात उंच धरायचं, दादानं तिचा हात ओढायचा, ताईनं त्याची कॉलर ओढायची, दादानं शेपटा खेचायचा, ताईनं मिशी ओढायची, दादानं चिमटा काढायचा, ताईनं चापट मारायची, दादानं वेडवायचं, ताईनं जीभ दाखवायची, दादानं बोचकारायचं, ताईनं चावायचं, आणि शेवटी....''ऑईऽ बॉग नॉ ग हॉ दॉदॉ...दाद्याऽ....दादिटल्यां....खापिटल्या'' इत्यादी इत्यादी (हुश्श!). शेवटी नऊवारीतल्या ताईला आणि धोतरातल्या दादाला एकाच वेळी कुशीत घेण्याचा आटोकाट प्रयत्न करत ती माउली कृतार्थपणे म्हणायची, ''बाळांनो, जगात कितीही मोठे झालात तरी घरात असेच लहान रहा बरं.'' आमच्या सुदैवानं जगातही फार मोठं होण्याचा ताण आमच्यावर पडला नाही; कारण जगच दिवसेंदिवस आमच्यासाठी प्रेमळ प्रेमळ, लाडिक लाडिक होत गेलं. साध्या जाहिरातीचं घ्या ना. ''ए, मला हे नाटक बघायचंय हं. कधी बघू?'' किंवा ''शी बैऽ! काय सर्दी झालीये मला! मी काय घेऊ?'' असला सगळा अवतरणातला मामला. पत्रांमधले राजमान्य राजर्षी केव्हाच गेले आणि लाडिकपणाच राजमान्य झाला. ''माझी ही गोष्ट छापली नाहीत तर मी रागावणार आहे बर्का. मी कालच वर्षाची वर्गणीसुद्धा भरलीये. तरी गोष्ट परत

'राजहंसी' विविधा

पाककला, ब्यूटी पार्लर, फेरीवाले,
राशीभविष्य अशा अनेक दैनंदिन विषयांवरील
खुसखुशीत लेखन...

झुळूक

मंगला गोडबोले

आवृत्ती नववी । किंमत : ₹ १४०/- । (ट.ख. स्वतंत्र)

आयुष्यातील पासष्ट वर्षे जंगलात वास्तव्य केलेल्या,
प्राणिजीवनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास केलेल्या
अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांचा
कुमारवयीन मुलामुलींना करून दिलेला
हा सुबोध चरित्रात्मक परिचय...

मुलांचे चितमपल्ली

डॉ. उमेश करंबेळकर

किंमत : ₹ २००/- । (ट.ख. स्वतंत्र)

व्यक्तिस्वातंत्र्य, इतिहास आणि बुद्धिप्रामाण्य
या तीन विषयांशी निगडित असलेले हे लेख.
भवताल आणि जगभरातलं राजकारण, समाजकारण
डोळसपणे समजून घेत मानवतेचं व परिपक्व -
संतुलित लोकशाहीचं स्वप्न पाहणाऱ्या
समाजशील व्यक्तीचं हे चिंतन...

शहाणा असशील तर लिहू नकोस...

लोकेश शेवडे

किंमत : ₹ ३४०/- । (ट.ख. स्वतंत्र)

केलीत तर गट्टी फू करीन हं!'' अशी पत्रं प्रौढ लेखक लेखिकासुद्धा संपादकांना पाठवतात. मग बालसाहित्य व साहित्यिक हं हं आणि हंहंहंच्या आहारी गेल्यास अळीमिळी घालायची नं? मध्यंतरी एक आमंत्रण आलं होतं. त्यात हा असलाच 'हं, बर्का, नैका आणि ओळखा'चा ताप होता. ते एका भावी बालसाहित्यिकाचं असावं, एवढंच मी ओळखू शकले. 'परवा आमच्याकडे काय असेल? ओळखा बरं. परवा आहे माझाऽ वाढदिवस. कितवा असेल? चौथा....? चूक....तिसरा? साफ चूक. दुसरा....? आम्ही काय एवढे मोठ्ठे वाटतो तुम्हांला? पहिलावहिला वाढदिवस! या पहिल्यावहिल्या वाढदिवसाला केक आहे, कॅण्डल आहे, वेफर्स आहेत, थम्स-अप आहे, मी आहे, तुम्ही पण आहात ना?'

वाचता वाचता डोकं इतकं चढलं की, त्या पहिल्यावहिल्या वाढदिवसानिमित्त त्या काट्यांला पहिलीवहिली कचकचीत हाणण्यासाठी हात शिवशिवायला लागले, तेवढ्यात पुढे नजर गेली– ''....असं किनई आमचा राजू म्हणतोय. त्याच्या विनंतीस मान देऊन यायचं हं,'' खाली मातापितरांच्या सह्याही होत्या आणि पदव्याही. त्यामुळे बोलणंच खुंटलं. शिवशिवणाऱ्या हातांनी पहिल्यावहिल्यांदा स्वत:चे कान धरले. इथून पुढे काहीही गोड गोड निरर्थक चालवून घ्यायचं हं!

तरी पण लडिवाळपणा आपल्या घराघरांमध्ये आणण्याचं खरं श्रेय मात्र दूरदर्शनचंच. निवेदिकांचं ते खोटं खोटं, गोड गोड बोलणं, ते सारखंसारखं ''मंडळी...मंडळी'' करत दर्शकांच्या गळ्यात पडणं, ''कशं पकल्लं च्योलाला'' अशा आविर्भावात मुलाखती घेणं.... 'तुझं दर्शन नको, पण दूर हो' असं म्हणायची पाळी येते एकेकदा. असाच एकदा पावसाळी गीतांचा कार्यक्रम चालला होता. म्हणजे गीतं थोडी, लडिवाळपणाचा पाऊसच जास्त. दिवाळीसारखी पावसाच्या स्वागतासाठी अमर्याद नटलेली निवेदिका भिजट्ट चिपक्या आवाजात आपली अखंड बरसत होती, ''हॉ पाउस मंजे ऑस्सॉ आहे....उगॉच एखॉद्याॅलॉ वॉट बघॉयलॉ लॉवॉयची आणि यॉयचच नाहीऽ आणि एखॉद दिवशी नक्को तेव्हा हज्जर! दुष्ट कुठलॉ!'' मग एक किंचित गीत, की पुन्हा पाऊस ''ऑस्सॉ आहे...तॉस्सॉ आहे'' सुरूच. छत्री रिपेअरवाल्यासारखी उत्कटपणे पावसाची वाट पाहिली असेल त्या दिवशी सगळ्या दर्शकांनी. झुमका, अंगठी, छल्ला इत्यादींचे प्रदर्शन झाल्यावर पुढे पुढे तर ती निवेदिका खाली बघून बोलायला लागली तेव्हा वाटलं, खाली एखाद्या पाळण्याबिळण्यात पाऊस ठेवला असावा आणि त्यानं भिजवलेलं दुपटं ही बदलणार असावी. लडिवाळपणात कोण काय करेल याचा काय नेम?

असं सगळं पाहिलं की विचारावंसं वाटतं, ''अहो, मला किनै या लाडिकपणाची ॲलर्जी झालीये. मी काय घेऊ सांगाल का बै? सांगाच हं.''

❍

हसगत

दिलीप प्रभावळकर यांच्या 'हसगत'विषयी जयवंत दळवी म्हणतात, ''हे पुस्तक 'गमतीदार' आहे, ते अशा अर्थानं की, गालांत हसण्यापासून तो थेट खळखळून धबधबा फुटल्यासारखं हसण्यापर्यंत हसण्याचे विविध प्रकार यातून अनुभवता येतात. खुमासदार शैलीतले यातले लेख खूपच वाचनीय झाले आहेत. कधीही कंटाळा आला तर उघडावं आणि एखादा लेख वाचून मिटून ठेवावं, असं हे पुस्तक आपल्या मिटलेल्या चित्तवृत्ती उजळून टाकतं.''

'मिशन इन माथेरान' या लेखातील प्रस्तुत अंश आपणांस हाच प्रत्यय देईल....

मिशन इन माथेरान

मी टक लावून तिच्याकडे पाहत होतो. ती तसंच पाहत होती माझ्याकडे. ती म्हणजे माकडाची मादी. तिच्या पोटाला पोर लटकलं होतं आणि हातात काहीतरी खाण्याची वस्तू होती. माझ्याकडे पाहतापाहता ती खाण्याचंही विसरली होती. माझ्यात काय असं विशेष पाहिलं तिनं? तिचं तोंड मात्र लाल होतं. तरुण असावी. कदाचित नर माकडांच्या दृष्टीला ती खूप सुंदरही वाटत असेल. तशी बरी होती दिसायला. त्या पोराचा बाप कोण असेल? हिचं त्याच्यावर प्रेम असेल का? की आपलं वडीलधाऱ्याचं ऐकून निमूटपणे...

''बबन, बघतोयस कुठं? चहा थंड झाला!'' माझी विचारांची साखळी तुटली. मी दचकून समोर पाहिलं. गुलूआत्याचं विणकाम जोरात चाललं होतं. बराच वेळ माकडिणीच्या तोंडाकडे बघत राहिल्यामुळे असेल, पण मला गुलूआत्या एकदम सुंदर वाटली. म्हणजे ती तरुणपणी सुंदर असेलही. पण अलीकडे तिच्या शरीराची फारच भरभराट झाली आहे. ह्या माझ्या आत्यानं घरून पळून जाऊन मधुकररावांशी लग्न केलं असं सांगतात. त्या वेळी ती बारीकही होती. हरणासारखी पळाली असेल. आता ती चालतेसुद्धा गजगतीनं.

ही माझी आत्या खूप श्रीमंत आहे. मधुकररावांचा लोणची, पापड आणि मेतकुटाचा धंदा आहे. त्यात त्यांनी बराच पैसा मिळवला आहे म्हणतात. इथं महाराष्ट्रात विशेष नाही; पण ओरिसा, हिमाचल प्रदेश आणि आसाममधल्या हॉटेलांत 'मधुकर पापड-लोणची' फार लोकप्रिय आहेत असं सांगतात. हिमाचल प्रदेशातल्या काही हॉटेलांत तर 'मधुकर' मेतकूट आणि भात रविवारची फीस्ट म्हणून वाढतात.

तर ही गुलूआत्या परवा मी सलूनमधून घरी आलो तर आमच्या स्वयंपाकघरात आईशी बोलत असलेली दिसली. मी आल्यावर दोघी हसल्या. मला वाटलं, केस नेहमीपेक्षा बारीक कापल्यामुळे मी विचित्र दिसत असेन म्हणून हसल्या असतील. पण नाही. आई म्हणाली, 'बबन, आत्या तुला माथेरानला बोलावते आहे. जाणार आहेस का? तू हो म्हटल्यावर तिकीट काढणार तुझं.''

एखाद्याला 'तुला पन्नास हजाराची लॉटरी लागली आहे; तू हो म्हटलंस तर तुला कॅश मिळेल' असे म्हटल्यावर त्याला जे होईल ते मला झालं. माथेरानला आणि मला नेणार? माझा माझ्या कानांवर विश्वास बसेना. अजूनपर्यंत मी फक्त कल्याणपर्यंत (सेंट्रल रेल्वे) मावसभावाच्या मुंजीसाठी आणि बोरिवलीला (वेस्टर्न रेल्वे) नॅशनल पार्कमध्ये वाडीतल्या मुलांची पिकनिक होती म्हणून जाऊन आलो होतो. कुणाला सांगायची लाज वाटेल अशीच ही गोष्ट होती.

गुलूआत्याला रेस्ट हवी होती आणि गेल्या वर्षी मधुकररावांना सौम्य हार्ट-

अटॅक आल्यापासून (बाथरूममध्ये अंघोळ करताना पडले. अटॅक आला तेव्हा डोक्याला साबणाचा फेस तसाच होता.) ते कुठं लांब जायला घाबरतात. मोठ्या मिनतवारीनं माथेरानला जायला ते तयार झाले. आणीबाणीच्या प्रसंगी कोणी धावपळ करायला बरोबर हवा म्हणून आत्याला भाच्याची आठवण झाली. मी लगेच 'हो' म्हणून टाकलं. अशी संधी पुन:पुन्हा थोडीच येते?

एखाद्या स्वप्नात वावरणाऱ्या माणसासारखी माझी स्थिती झाली होती. मी माझी बॅग भरली केव्हा, गाडीत गुलूआत्या आणि मधुकररावांबरोबर बसलो केव्हा, आणि नेरळला गाडी बदलून छोट्या गाडीतून माथेरानला पोहचलो केव्हा, माझं मलाच कळलं नाही.

माथेरानचं तर सगळं जगच वेगळं आहे. झाडांवरची माकडं, लाललाल रस्ते, बैठी हॉटेल्स आणि त्या माणसांनी ओढायच्या रिक्शा! आपण तर बुवा प्रेमात पडलो माथेरानच्या!

आल्या दिवशी संध्याकाळी आम्ही 'एको पॉइंट'वर फिरायला गेलो. गुलूआत्या आणि मधुकररावांसाठी दोन रिक्शा ठरवल्या होत्या. दोघांना मिळून सहा माणसं ढकलत होती. 'एको पॉइंटवर' आपण उच्चारलेल्या शब्दाचा प्रतिध्वनी आपल्याला ऐकू येतो असं कळलं म्हणून मी टारझनसारखं ओरडून पाहिलं. मग मधुकरराव 'मेतकूऽट' असं ओरडल्यावर 'कूऽऽऽट' असं डोंगरातून ऐकू आलं. त्यांनी 'पापड' म्हटल्यावर 'पड' असं ऐकू आलं. गुलूआत्यानं एका प्रसिद्ध भक्तिगीताची एक सबंध ओळ म्हटली. पण यावेळी मात्र फक्त शेवटचा शब्द ऐकू आला.

''बिस्किटं नाही खाल्लीस ती!'' गुलूआत्याच्या ओरडण्यामुळे मी पुन्हा भानावर आलो. आत्याचं साधं बोलणंसुद्धा ओरडल्यासारखं असतं. तिचा जीव आहे माझ्यावर. तिला मूलबाळ नाही. माझे लाड करते ती. तशी अधूनमधून दम देते; पण तो प्रेमानं.

पूर्व बंगालमधील सोळाव्या शतकातील कवयित्री चंद्रावतीचा डॉ. माधवी भट यांनी करून दिलेला हा सुरस परिचय. बंगालच्या लोकगीतांचा दरवळ, तेथील स्त्रीमनाचा उत्कट आविष्कार आणि रामायणाचं स्त्रीदृष्टीनं केलेलं हे आस्वादन...

चंद्रावती रामायण

डॉ. माधवी भट

किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

मी बिस्किटांनी भरलेली प्लेट रिकामी केली. म्हणजे आत्यानंच मला करायला लावली. कारण तिनं मधुकररावांना येताना पाहिलं. हॉटेलात प्रशस्त आवारात आम्ही झाडाखाली खुर्च्यांवर बसलो होतो. समोर चहाचा ट्रे. मधुकररावांच्या खाण्यावर आत्याचा वॉच असतो. जेवताना ती समोर बसून त्यांच्या घासातली कॅलरी न् कॅलरी मोजते. एवढे मोठे मधुकरराव! ओरिसा, हिमाचलप्रदेश आणि आसाममधल्या हॉटेलातल्या प्रवाशांच्या जिभेवर त्यांचं नाव. पण घरी मात्र त्यांच्या जिभेवर बायकोचं नियंत्रण. वाघासमोर बांधलेल्या शेळीसारखे ते जेवतात.

चहापानाच्या कार्यक्रमानंतर गुलूआत्या आणि मधुकरराव फेरी मारायला बाहेर पडले. मी हॉटेलातच रमलो. झोपाळ्यावर बसून झोका घेण्याची इच्छा होती. पण कोणी बघितलं तर? उगाच हसतील. नकोच ते. त्यापेक्षा हॉटेलच्या ऑफिसात जाऊन वर्तमानपत्रं चाळावीत. मी तिथं गेलो. आदल्या दिवशीची दैनिकं होती. मी क्रिकेटचा स्कोअर वाचून संपवला. तेवढ्यात त्या ऑफिसातल्या फोनची घंटा वाजू लागली. मी दचकून पेपर खाली ठेवला आणि फोनकडे पाहू लागलो. आजूबाजूला कोणीच नाही. मी एकटा. उचलावा का फोन? पण मॅनेजरशी कोणाला गुजरातीत बोलायचं असेल तर? काय करावं? फोनची घंटा थांबायलाच तयार नाही. पण मी का घ्यावा फोन? अशा वेळी काय करतात?

अचानक कुणाची तरी चाहूल लागली. त्याबरोबर मी अर्धवट उठलो होतो तो पटकन खाली बसलो आणि दैनिक तोंडासमोर धरलं. फोन उचलल्याचा आवाज आला. मी हळूच पेपराच्या वरून पाहिलं. तो मॅनेजर नव्हता. आमच्या शेजारच्या खोलीत राहणारा रहस्यमय गृहस्थ होता. एकटाच हॉटेलात आला होता. रात्री कधी मला मधुकररावांच्या घोरण्यामुळे जाग आली तर त्याच्या खोलीत दिवा पेटलेला

''प्रभावळकरांच्या विनोदात उपहासानं जग सुधारण्याचा हेतू नसतोच. असतो तो आनंद देणं - हा एकमेव हेतू. लावायचीच झाली तर त्याला पुष्कळ प्रतिष्ठित लेबलं लावता येतील; परंतु प्रभावळकरांच्या 'असली' विनोदाला ती लावू नयेत, या प्रांजळ मताचा मी आहे.''

- मं. वि. राजाध्यक्ष

हा अनुभव घ्यायला संग्रही हवंच हे पुस्तक...

हसगत

दिलीप प्रभावळकर

आवृत्ती नववी । किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. स्वतंत्र)

अभिनंदन!

दत्तात्रेय कृष्ण सांडू प्रतिष्ठान, चेंबूर साहित्य पुरस्कार

ललित साहित्य प्रकार

सयसंगत

सई परांजपे

एक उलट... एक सुलट भाग २

अमृता सुभाष

आत्मकथन साहित्य प्रकार

अलौकिक अंटार्टिका

डॉ. गायत्री हर्षे

बालसाहित्य उल्लेखनीय पुरस्कार

छोट्यांचा मोठा प्लॅन

मुग्धा शेवाळकर

दिसतो. काहीतरी संशयास्पद हालचाली ऐकू येतात. खलनायकासारखा दिसतो तो. खोल डोळे, डोळ्यांखाली काळे, पिंजारलेल्या मिश्या, रागीट चेहरा, ही सगळी खलनायकी चिन्हं; आणि त्या चिन्हांना दृष्ट लागू नये म्हणून गालावर एक व्रण!

त्यानं फोन उचलला. काही वेळ नुसतंच 'हूं... हूं' करून मग एकदम ''नेकलेसचा बॉक्स?'' असं तो ओरडला. मी चपापलो. मग — ''किती? आय सी... दॅट्स व्हेरी कॉस्टली... आय ॲग्री... अशी कशी विसरलात? कुठून? मुंबईहून बोलताय? अच्छा... कुठं पलंगाखाली?... बरं बरं. रूम नंबर सात ना? ठीक आहे. मी कळवतो मॅनेजरला... तुम्ही कधी येणार? रात्री? बरं या... आय शॅल डू माय बेस्ट... ठीक आहे.''

हे सारं तो खलनायक बोलत असताना मी सावरून बसलो होतो. मला त्यानं पाहिलं नसावं खास! तो फोन ठेवून लगबगीनं चालता झाला. मी तो काय बोलत होता ते आठवून पाहिलं : सात नंबरची खोली... नेकलेस... कॉस्टली... म्हणजे महाग नाही का?...

मी विचार करू लागलो. म्हणजे इथं ह्या हॉटेलात येऊन गेलेल्या कुणाचा तरी नेकलेस राहून गेला आहे. ते रात्री येणार? बाप रे! मी एकदम ताठ बसलो. त्या गृहस्थाने मॅनेजरला म्हणून फोन केला आणि घेतला ह्या खलनायकी माणसानं. समजा त्यानं निरोप सांगितला नाही तर? परस्पर त्या खोलीत जाऊन तो नेकलेस शोधून काढला तर? त्या हलगर्जी सद्‌गृहस्थाना आपण कुणाला फोन केला ते कळलंच नाही. आजवर वाचलेल्या सगळ्या रहस्यकथा माझ्या डोळ्यांसमोर फेर धरून नाचू लागल्या. एक मन (आतलं) सारखं म्हणू लागलं, 'कर्तव्य कर...कर्तव्य कर.' दुसरं मन (बाहेरचं) म्हणे, 'मरू दे ना च्या मारी! करायच्यात काय भानगडी?' दोघांची फ्री-स्टाईल मारामारीच सुरू झाली. पहिलं मन (आतलं) जिंकलं. मी उभा राहिलो. खिडकीतून पाहिलं तर तो खलनायक बागेचं फाटक उघडून बाहेर पडताना दिसला. मी निर्णय घेतला : असंच करावं. मॅनेजरच्या टेबलाशेजारीच भिंतीवर खिळ्यांना नंबरवार किल्ल्या लटकवलेल्या होत्या. मी चाणाक्षपणे सात नंबरची चावी अलगद उचलली आणि लेंग्याच्या खिशात टाकली.

कोणी पाहिलं तर नाही मला? पण छे! भिंतीवर टांगलेल्या सोनामल मंगलदास मिठाईवाल्याशिवाय (त्या हॉटेलचे संस्थापक) तिथं कोणीच नव्हतं. मी त्या ऑफिसच्या पायऱ्या उतरून हॉटेलच्या रूम्स होत्या तिथे जाऊ लागलो. छाती फार जोरानं धडधडत होती. बघणाऱ्याला संशय येऊ नये म्हणून चालण्यात सहजता आणत मी सात नंबरच्या खोलीकडे गेलो.

पुढे बबननं अगदी शिताफीनं दागिन्यांची ती पेटी कशी शोधून काढली व मॅनेजरच्या ताब्यात दिली... या धाडसात मधुकररावांनीही त्याला कशी मदत केली ही सर्व धमाल मुळातून वाचण्यासारखी आहे.

चौकात उधळले मोती

'काव्य' हा उर्दू भाषेचा प्राणदिवा. अनेक श्रेष्ठ कवींनी तिच्या निळ्या ज्योतीवर झेप घेत अक्षरकाव्य लिहिलं. त्यांची कहाणी म्हणजे अंबरीश मिश्र यांचे हे पुस्तक आहे. शायर आणि शायरीची ही मनभावन मैफल वाचकांना आनंदित करणारी आहे... त्यातीलच हा एक मोती...

बेड्या विसर, तू नाच!

देख ज़िंदाँ से परे रंग-ए-चमन जोश-ए-बहार
रक़्स करना है तो फिर पाँव की ज़ंजीर न देख

माणूस परिस्थितीत अडकलेला असतो. साधनं तुटपुंजी, वाटेत काटेकुटे, आसपास भरवशाचं कुणी नाही आणि कधीही न संपणाऱ्या तृष्णेचा सर्पविळखा.

दुसऱ्या महायुद्धानंतर माणसाची तगमग वाढत गेली. यातून सुटका नाही - No exit हा विचार पाश्चात्त्य कला नि साहित्यात बळावला. माणसाचं हताश एकाकीपण, वैफल्य, तुटलेपण, विरूपता यांवर कामू, टेनेसी वुइल्यम्स, पिरांदेलो वगैरे विदेशी तत्त्वज्ञांनी, लेखकांनी श्रेष्ठ कलाकृती रचल्या. कळ्यांच्या जखमेसारखं कोमल लिखाण आहे हे.

मात्र, या प्रश्नावर पौर्वात्य संस्कृतीचं म्हणणं वेगळं आहे. ते मजरूह सुलतानपुरी यांनी या शेरमध्ये मनोज्ञपणे मांडलंय. परिस्थिती म्हणजे तुरुंग अशी कल्पना करून ते म्हणतायेत की, जरा तुरुंगाच्या गजांपलीकडे नजर टाक. फुलांना बहर आलाय, बागेवर वसंताचा धुंद रंग चढलाय. निसर्गाची ही चमचम बघ की. डोळे भरून पाहा. हे सगळं तुझंच तर आहे. अरे, तुला नाचावंसं वाटतंय ना? मग नाच की. पायांतल्या बेड्यांकडे पाहू नकोस. 'रक़्स' म्हणजे नृत्य.

जगण्यातून सुटका नसतेच. जगणं, हे माणसाच्या पाचवीला पुजलेलं असतं. दु:ख नि भयही संपत नाही. जगाचं भेसूर, हिंस्र रूप बघवत नाही. हेमिंग्वे किंवा सानेगुरुजींप्रमाणे आयुष्य संपवण्याचं धैर्यही नाही.

स्साला...आता करायचं काय?

तुरुंगाच्या गजांपलीकडे पाहायचं, वसंताच्या रंगांवर लुब्ध व्हायचं आणि पायांतल्या बेड्यांकडे दुर्लक्ष करून मनाचं स्वातंत्र्य मनातल्या मनात साजरं करायचं. मनातल्या मनात नाचायचं. 'सोडूनिया घरदार नाचणार नाचणार.' भौतिक जगापार जायचं, ऐहिक सुखापलीकडे झेप घ्यायची नि नाचता नाचता मुक्त व्हायचं.

खुद अपने ही भीतर से उभरता है वह मौसम
जो रंग बिछा देता है तितली के परों पर

(वसंत, वसंत म्हणतात, तो मनातच असतो. नि माणसाचं मनच फुलपाखरांच्या पंखांवर रंग अंथरतं.)

अखेरीस सगळं मनाच्या तळाशी लुकलुकत असतं : निसर्ग, सेक्स, प्रारब्ध, युद्ध, प्रेम, एकटेपण, वजूद, मुक्ती - आणि कविता.

❍

बिटविन द लाईन्स

कॅनव्हासवर शब्दांनी रंगवायला घेतलेली चित्रं पुस्तकाच्या पानांवर रंगांनी लिहिली गेली तर? - अशक्य असं जे घडतं, ते म्हणजे चंद्रमोहन कुलकर्णी यांचे हे पुस्तक! रंगांनी भिजलेल्या ओल्या बोटांमधून शब्द वाहते राहतात, तेव्हाच त्वचेखाली धावणाऱ्या रक्तवाहिन्यांच्या रेषा उकलून 'आत'ल्या आयुष्याचे लखलखते तुकडे असे अलगद शब्दांत बांधता येतात! .....याचाच हा एक वाचनानुभव....

जिलब्या

गेली एकदोन वर्षं सोडली,

तर त्याआधीची दोनतीन वर्षं मी आकाशकंदील अलिबागहून आणला.

तसा आकाशकंदील जगात कुठेच मिळत नाही.

करून घ्यायचा.

व्यवस्थित पारंपरिक पद्धतीचा. काड्यांचा. चार शंकरपाळी चौकोन-आठ त्रिकोण असलेला.

पण वरनं कागद जिलेटिनचा नाही.

पतंगाचा. मस्त एकदम.

करणाऱ्या मनुष्याचं नाव चितळे.

तिथंच अलिबागमधे घर आहे त्यांचं.

धंदा आकाशकंदील बनवण्याचा नाही.

धंदा : दुकान. इलेक्ट्रिकच्या वस्तू आणि इतर काही विकण्याचं. छोटीशी बंगली, बंगलीतच एका बाजूला छोटंसं, शेडवजा दुकान बांधलेलं.

टिपिकल कोकणस्थी टाईपचा नीटनेटका आखीव व्यवसाय. साडेबाराला घरात असलं, तरी दुकान बंद म्हणजे बंद. चारला नक्की उघडणार.

''आकाशकंदील सहज हौस म्हणून बनवतो.''

अलिबागमधे टाईमपास करत फिरताना अचानक एका आकाशकंदिलानं माझं लक्ष खेचूनच घेतलं.

भारी आकाशकंदील!!

मी जागेवर थांबलोच पॉवर ब्रेक लागल्यासारखा.

एका लॉजच्या बाहेर टांगलेला होता.

सांगाडा नेहमीसारखाच, पण वरचा कागद मस्त लावला होता. यलो आणि ग्रीनच्या अर्धा इंच जाडीच्या पट्ट्यांचं कॉंबिनेशन केलं होतं पट्ट्यानं! एक पट्टी ग्रीनची, एक यलोची. एक ग्रीन-एक यलो. एक ग्रीन-एक यलो. सगळीकडे मन लावूऽऽन काम केलेलं! पिवळ्या हिरव्या उजेडाच्या सुरेख चौकटी तयार झालेल्या. दर दोन पट्ट्यांच्या मधे सुटलेल्या अगदी किंचितशा जागेतनं प्रकाशाच्या झगझगीत रेषा बाहेर पडत होत्या. अगदी आनंदी अशी भरगच्च फुलं लावलेली चारही बाजूंना. वरच्या चार नि खालच्या चार बाजूंनासुद्धा गेंदेदार झुबके. कागदाचीच भरगच्च झालर. (सगळं कागदाचंच बरं का. प्लॅस्टीक, चमकी वगैरे छपरीगिरी काही नाही. सगळीकडे प्रेमळ असा कागद! व्हाईट-यलो-ग्रीन अशा रंगमेळाच्या गच्च झिरमिळ्या खाली सोडलेल्या. त्यावर विशिष्ट प्रकारे कात्री चालवून त्रिकोण त्रिकोण तयार केलेले. कुठे म्हणजे काटकसर, खडूसपणा, कंजूषपणा नाहीच!

मी फिदा होऊन बघतच राहिलो. सकाळच्या उजेडात पुन्हा जाऊन पाहिला. म्हटलं दिवसा कसा दिसतो ते बघावं. नुकतीच अंघोळ झालेल्या, टोपडं घातलेल्या एखाद्या गोंडस बाळासारखा दिसला. लॉजवाल्याला विचारून त्या चितळेचा पत्ता घेतला.

गेलो.

दुकानात होता. म्हणाला, ''आता संपली दिवाळी. आता पुढच्या वर्षी या. वेळ असला तर करीन. बायको गरोदर आहे. बाळ लहान असेल. कामं असतात. जमलं तर करीन.''

खूप बोलणी खाल्ली.

दिवाळीच्या चांगला महिनाभर आधी गेलो. तो चितळे आहे, तर मी कुलकर्णी आहे! म्हणाला, ''मला वाटलं विसरला असाल. बरं बोला.''

मी कलरस्कीम सांगितली. म्हणाला, ''असं कुणी सांगत नाही मला, पण हे पण बरं दिसेल, म्हणून करून बघू.''

दुपारी अकराला वगैरे गेलो होतो. दोनला काम सुरू केलं. दुकान संभाळत, मूल सांभाळत असं करत करत हातात आकाशकंदील पडायला सात वाजले.

मी म्हटलं, ''किती झाले?''

मी कितीही मागितले तरी देणार होतो. म्हणजे आठशे वगैरेसुद्धा. हजारपण.

म्हणाला, ''जरा जास्त होतील... तीनशे होतील.''

म्हटलं, ''घ्या.''

मला मोह सुटला. मनात म्हटलं, घरी एक, स्टुडिओवर एक.

म्हणालो, ''अजून एखादा होईल का? पुढच्या आठवड्यात चक्कर मारतो परत. तुम्ही बनवून ठेवा, तो पिवळा हिरवा दिला होता ना लॉजमधे, तसा!''

मला म्हणाला, स्पष्ट,

''जमणार नाही. वेळ नाही असं नाही. पण हा चांगला झालाय. आता पुरे.

आठवणी, अनुभव, वाचन आणि निरीक्षण
यांचा मेळ साधत फुललेलं...
काव्यात्म शैलीतील आत्मपर लेखन...
आपल्याही जगण्याला सहज स्पर्शणारं!

देठ जगण्याचा

डॉ. नीलिमा गुंडी

किंमत : ₹ १२५/- । (ट.ख. स्वतंत्र)

जास्ती करू नये माणसानं. शिवाय तुम्ही तर आर्टिस्ट आहात, तुम्हाला माहिती आहे, किती आणि कसं काम केलंय ते!

नाव 'चितळे' असलं, तरी जिलब्या नाही घालत मी. आकाशकंदील करतो.

पुढच्या वर्षी देईन, तुमच्यासाठी नक्कीच करीन एखादा.

नमस्कार, या.''

❍

संवेदनशील कवी, कादंबरीकार, जाणकार रसिक असलेल्या

विलास शेळके यांच्या अनुभवक्षणांची

ही पूर्व-मध्य-पश्चिम जगाची अनोखी सफर घडवणारी अक्षरयात्रा...

जरूर वाचावीत व संग्रही ठेवावीत अशी प्रवासवर्णनपर पुस्तके...

पूर्वायन

किंमत : ₹ ४३०/-

मध्यमायन

किंमत : ₹ ३५०/-

पश्चिमायन

किंमत : ₹ ५००/-

टपालखर्च स्वतंत्र

'काव्य' हा उर्दू भाषेचा प्राणदिवा. अनेक श्रेष्ठ कवींनी तिच्या निळ्या ज्योतीवर झेप घेत अक्षरकाव्य लिहिलं. त्यांची कहाणी म्हणजे हे पुस्तक आहे. शायर आणि शायरीची ही मनभावन मैफल वाचकांना आनंदित करणारी आहे.. त्यातीलच हा एक मोती...

चौकात उधळले मोती

अंबरीश मिश्र

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

एका रानवेड्याची शोधयात्रा

चाकोरीतल्या अपयशानं खचून न जाता चाकोरीबाहेरचा छंद मनापासून जोपासत कृष्णमेघ कुंटे यांनी लिहिलेलं हे पुस्तक म्हणजे निसर्गप्रेमाचा सहजसुंदर आविष्कार! त्यांची मदुमलाईची ही आठवण अविस्मरणीय क्षणांचं दान आपल्या ओंजळीत टाकणारी....

मदुमलाई आठवताना

जंगल जवळून बघणं हा एक मनस्वी अनुभव असतो. आठवड्या-पंधरवड्यासाठी जाऊन जंगल पाहणं आणि जंगलात घर करून जंगल आजूबाजूला अनुभवणं, यात मात्र जमीन-अस्मानाचा फरक आहे. जंगलातल्या थोड्या दिवसांच्या फेरीत वाघ, हत्ती, दुर्मिळ पक्षी असं बरंच काही भन्नाट दिसू शकतं, नाही असं नाही. हे सारं पाहण्यामध्ये निर्विवादपणे मजा आहेच.

पण जंगल म्हणजे प्राणी, पक्षी, झाडं, फार तर फुलपाखरं, साप, सरडे, किडे हे समीकरण खूप उथळ झालं. निसर्गाकडे केवढं अंतर्मुख होऊन बघण्यासारखं, शिकण्यासारखं, विचार करायला लावणारं आहे! एक पायरी ओलांडली की निसर्गवेडा झोंबणाऱ्या गारव्याची तमा बाळगत नाही, पावसाला बधत नाही. उलट, मग भोवळ आणणाऱ्या उन्हाचंही आकर्षण वाटायला लागतं, अखंड झोडपून काढणाऱ्या पावसात जळवांनी वळवळणाऱ्या जंगलातही गंमत वाटू लागते.

मी विशीचा होईपर्यंत हे सारं मला कळायला लागलं होतं, पूर्णपणे वळायची संधी मिळाली नव्हती. अगदी अनपेक्षितपणे आणि विचित्र परिस्थितीमध्ये मला एक अखंड ऋतुचक्र, जंगलात घर करण्याची संधी मिळाली. त्याबद्दल पुढे येईलच.

९४ साली ऑगस्टपासून पुढे एक संपूर्ण वर्ष म्हैसूरजवळच्या मदुमलाई अभयारण्यात मी माझा मुक्काम हलवला तो जुलै ९५ पर्यंत. आपल्याला शहरात कल्पनाही करता येणार नाहीत अशा अनेक गोष्टी जंगलात पाहिल्या, स्पर्शल्या, खोल श्वास घेऊन छातीत भरून ठेवल्या. पायी खूप भटकलो. ऋतूनुसार आणि दिवसागणिक बदलणाऱ्या निसर्गाच्या विविध छटा अनुभवल्या. एक मंत्रमुग्ध विश्व उपभोगलं, एक भारलेला काळ जगलो.

पूर्वीच्या माझ्या अबोल, एकलकोंड्या स्वभावाचं असं गप्पाप्रिय स्वभावात कसं रूपांतर झालं याची मला नक्की कल्पना नाही. कदाचित 'विश्व प्रकृति निधी'च्या गत-'कट्टा'चा यात वाटा असावा. मदुमलाईला गेल्यावर मी कट्ट्यावरच्या मित्र-मैत्रिणींना मदुमलाईच्या जंगलातले अनुभव कळवणारी पत्रं पाठवण्याचा सपाटा लावला, क्वचित एखादा छोटा लेख. फार लेख लिहिण्याचा विचार मनाला शिवला नाही, कारण मी मदुमलाईला जाण्याच्या चार वर्षं आधी डॉ. मिलिंद वाटवे– 'वाटवे सर'– तिथं त्यांच्या वन्य प्राण्यांच्या अभ्यासासाठी दोन वर्षं राहून आले होते. ते पुण्याला घरी परतल्यावर, गरवारे कॉलेजमध्ये दाखल झाल्यावर त्यांच्या अनुभवांवर बेतलेले लेख त्यांनी दैनिक 'सकाळ' मध्ये छापले. कालांतरानं त्यांचं 'आरण्यक' नावाचं छोटंसं पुस्तकही प्रसिद्ध केलं. 'आरण्यक'चा राग-रंग, उंची काही वेगळीच आहे.

'इतकं चांगलं पुस्तक मदुमलाईच्याच अनुभवांवर असताना मग अजून लेख किंवा पुस्तक कशासाठी?' या विचारानं मी लेखणी जरा दूरच ठेवली होती.

वाचकांच्या अंगणात नव्याने उतरलेली 'राजहंसी' पुस्तके

परकीय भाषांतील वेचलेल्या वेधक, अद्भुत कथा.
सदासर्वकाळ टवटवीत वाटणाऱ्या आणि
सर्वांनाच आपल्या वाटतील अशा...
तेव्हा जरूर वाचा -

गवसलेल्या गोष्टी

डॉ. चंद्रशेखर फणसळकर

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. स्वतंत्र)

या सुरस कथा आहेत... जन्म-मृत्यू, व्याधी, दुःख,
स्वार्थ, परमार्थ अशी विविध आशयसूत्रं हाताळणाऱ्या...
परिचिताला अपरिचित बनवणाऱ्या...
वास्तव आणि फँटसी यांमध्ये पूल सांधणाऱ्या...

कथा चाळिशी

डॉ. चंद्रशेखर फणसळकर

किंमत : ₹ ३९०/- । (ट.ख. स्वतंत्र)

अकोला शहराचे कलात्मक, साहित्यिक, सांस्कृतिक
पर्यावरण समृद्ध करणारे चतुरस्र व्यक्तिमत्त्व
म्हणजे प्रा. पंढरीनाथ मांडवगणे.
त्यांच्या संपन्न आयुष्यातील ही प्रतिभावंतांची मांदियाळी
वाचकांचंही आयुष्य समृद्ध करणारी आहे.

प्रतिभावंतांची मांदियाळी

प्रा. पंढरीनाथ मांडवगणे

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. स्वतंत्र)

९५ साली मदुमलाईहून पुण्याला परतल्यावर त्याच वर्षात दोनदा मी फुलपाखरांचा अभ्यास करण्यासाठी सह्याद्रीत महिन्या-दोन महिन्यांचे दौरे करून आलो होतो. त्या दौऱ्यांदरम्यान बऱ्याचदा कर्नाटकात, केरळात कानाकोपऱ्यातल्या खेड्यांमध्ये बससाठी अनेक तास वाट बघण्याची पाळी माझ्यावर आली. बसल्या-बसल्या मग माझ्या मनात मदुमलाईच्या ताज्या आठवणी दाटून यायच्या, सहजपणे पेन कागदावर झरझर नाचू लागायचं. डायरीच्या पानावर, कोपऱ्यात पडलेल्या पाठकोऱ्या कागदावर, बसस्थानकावरच्या कागदाच्या बोळ्यावर, मिळेल त्या पांढऱ्या पृष्ठभागावर ओळी उतरू लागल्या...

बिलीगिरीरंगन टेकड्यांवर जाण्यासाठी बसची वाट बघत असताना म्हैसूर स्थानकावर 'नापास झालेल्या मुलाची कथा' उतरलं, 'वीरप्पन' अर्धवट झाला. शृंगेरीजवळ एका दिवे नसलेल्या खेड्यात पावलाला जखम होऊन दोन दिवस नुसतं बसण्याची पाळी आली, तेव्हा पावसाच्या रिमझिम नादात 'ऋतुचक्र' लिहून झालं. मग आपसूकच लेखांची एक मालिका तयार झाली. त्या दरम्यान 'वाइल्ड'च्या शेखर नानजकरांना 'वसुंधरेचा श्रावण'साठी काही भन्नाट हवं होतं, म्हणून ते लेख त्यांच्याकडे दिले. मी एम.एस्सी.साठी डेहराडूनला गेल्यावर ९७-९८ साली ते लेख इकडे 'श्रावण'मध्ये छापून आले. त्यानंतर मदुमलाईचे लेख हा विषय माझ्या डोक्यातून पुरता निघून गेला. मदुमलाई सोडून मला आता बरोबर सहा वर्षं झाली. मग नव्यानं हा सारा खटाटोप कशासाठी?

मदुमलाईच्या लेखांमध्ये मी लिहिलं होतं, 'आयुष्यातल्या असंख्य क्षणांपैकी मोजके क्षण अजरामर असतात. त्यांचा मोठा खोल ठसा मनावर उठतो. शेवटी हेच निसटते क्षण काय ते आपले असतात. बाकी सगळं आयुष्य म्हणजे लादलेला भारा असतो.'

❍

चाकोरीतल्या अपयशानं मुळीच खचून न जाता, चाकोरीबाहेरचा छंद मनापासून जोपासत एका तरुणानं लिहिलेलं हे पुस्तक म्हणजे निसर्गप्रेमाचा आगळा आविष्कार! प्रत्यक्ष निसर्गसहवासाचा आनंद देणारं सहजसुंदर शैलीतलं हे पुस्तक....

एका रानवेड्याची शोधयात्रा

कृष्णमेघ कुंटे

आवृत्ती आठवी । किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. स्वतंत्र)

राग दरबारी

शोभा बोंद्रे यांनी राजकारण, साहित्य, उद्योग, कला, अशा विविध क्षेत्रांत लखलखीत कामगिरी केलेल्या वलयांकित व्यक्तिमत्त्वांच्या जीवनप्रवासातील लक्षणीय, अविस्मरणीय क्षण येथे टिपले आहेत आणि वाचकाला बहारदार मैफिलीत सामील करून घेतले आहे. त्यांनी चितारलेल्या प्रिया तेंडुलकर या कलासक्त अभिनेत्रीच्या शब्दचित्रातील हा संपादित अंश....

एक कळी खुलली फुलली, पण - प्रिया तेंडुलकर

प्रिया मला पहिल्यांदा भेटली ती सुषमा तेंडुलकरची धाकटी बहीण म्हणून. छबिलदास शाळेतल्या प्रायोगिक रंगमंचावर सुषमाचं 'पाहिजे जातीचं' हे नाटक गाजत होतं. प्रायोगिक नाटकाचे रंगकर्मी म्हणून आम्ही छबिलदासमधल्या अनेक प्रयोगांना उपस्थित राहत होतो. पार्ल्याला परत येताना अनेकदा सुषमा आणि प्रिया आमच्याबरोबर असायच्या.

प्रिया त्यावेळी कॉलेजमध्ये होती. गोरी गोरी, नाकीडोळी रेखीव, चणीनं मध्यम उंचीची. शरीरबांधा अगदी नाजूक. सतरा-अठरा वर्षांमध्ये असतो तसा उत्साह, मोकळाढाकळा बडबड्या स्वभाव आणि निरागसता. एकूणच माझं आणि तिचं खूप छान जमायचं. पार्ल्याच्या लोकमान्य सेवा संघात त्यावेळी एक एकांकिकास्पर्धा आयोजित केली होती. दोनच पात्रं असलेलं एक छान स्क्रिप्ट माझ्याकडे होतं. लेखक आठवत नाही. स्पर्धेत मी ते स्क्रिप्ट करायचं ठरवलं. प्रिया त्यावेळी बालनाट्यात वगैरे काम करायची, एवढं मला ठाऊक होतं.

मी तिला विचारलं, 'स्पर्धेत नाटक केलं, तर तू काम करशील का? तू कैकयी आणि मी मंथरा.' तिला मी स्क्रिप्ट दाखवलं. ती 'हो' म्हणाली आणि आम्ही तालमीला सुरुवातही केली. कधी तिच्या घरी, तर कधी माझ्या.

नाटक छोटं होतं. भूमिकाही दोनच. त्यामुळे पटकन बसलं. स्पर्धेला पाच-सहा दिवस उरले होते आणि मी प्रियाच्या घरी गेले, तर प्रियाचा पाय प्लास्टरमध्ये. 'हे काय?' मी थक्क झालेली. प्रिया मात्र काही विशेष न घडल्यासारखी, नेहमीच्याच उत्साही मूडमध्ये.

'काल पाय घसरून पडले रस्त्यात. डॉक्टर म्हणाले,

'फ्रॅक्चर आहे.' म्हणून प्लास्टर घालावं लागलं.'

'दुखतंय का? तुला त्रास होतोय का?'

'विशेष नाही.'

'चला. तेवढं तरी बरं आहे, पण आपण आता नाटक रद्द करू.' जोरजोरात मान हलवीत प्रिया म्हणाली, 'अजिबात नाही. नाटक करायचंच.' मी तिला समजावण्याचा प्रयत्न केला. 'अगं, तुला आत्ता चालताही येत नाहीये. '

ती हट्टानं म्हणाली, 'नाटकाच्या दिवसापर्यंत येईल चालता आणि पाय प्लास्टरमध्ये असला, तरी काय झालं? मी करीन काम. '

मी मान हलवली, 'अगं, तुला नाही शक्य होणार, प्रिया.' तिनं तिचाच हेका कायम ठेवला.

त्यावेळी तिच्याशी जास्त न बोलता मी घरी आले. दुसऱ्या दिवसापर्यंत नीट विचार केला आणि निर्णय घेतला, 'नाटक रद्द करायचं.'

चालता न येणारी, पाय प्लास्टरमध्ये असलेली कैकयी? गंभीर नाटकाचं विनोदी नाटक होईल. प्रिया लहान आहे आणि लहान मुलीसारखाच विचार करते आहे. मी प्रियाला फोन करून माझा निर्णय कळवला.

संध्याकाळी मी लोकमान्य सेवा संघात गेले, तर तिथे वेगळंच नाटक. ती मंडळी मला नाटक रद्द करू देईनात, कारण स्पर्धेत फारच कमी लोकांनी भाग घेतला होता. त्यांना मी प्रियाबद्दल सांगितलं.

'तू दुसऱ्या कोणाला तरी घे गं. अजून पाच दिवस आहेत.'

मी नाइलाजानं माझ्या एका मैत्रिणीला तयार केलं. पाच दिवसांत तिचं पाठांतर कदाचित नीट होणार नाही, म्हणून प्रॉम्प्टरची सोय केली. घाईघाईनं तालीम सुरू केली.

प्रियाला फोन करून सर्व सांगावं, असं दहादा मनात आलं; पण धीर होईना. ती परिस्थिती समजून घेणार नाही, माझा विचार तिला पटणार नाही, असं वाटल्याने मी तिला फोन केला नाही. मी चूक करते आहे, हे मला कळत होतं.

आणि त्याची टोचणीही मनाला जाणवत होती.

स्पर्धेचा दिवस उजाडला, पण नेहमीचा उत्साह नव्हता. 'चला, नाटक उरकून टाकू.' अशीच भावना.

आमच्या नाटकाचं नाव घेतलं, तशी मी मंथरेच्या भूमिकेत रंगमंचावर प्रवेश केला. नाटक सुरू होऊन आठ-दहा मिनिटं झाली असतील आणि अचानक मला 'ती' दिसली. हॉलमधल्या एका खिडकीपाशी चौकटीचा आधार घेऊन उभी असलेली प्रिया. पाय प्लास्टरमधेच होता, पण चेहरा निर्विकार.

विविध क्षेत्रांत लखलखीत कामगिरी केलेल्या
अनेक वलयांकितांची शब्दचित्रे
म्हणजे वाचकांसाठी एक संपन्न मैफीलच!

राग दरबारी काही वलयांकित गाठी भेटी
शोभा बोंद्रे

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. स्वतंत्र)

पुढच्याच क्षणी मी ब्लँक झाले. माझी नजर तिच्यावरून हलेना आणि मला माझी भूमिका, माझे शब्द काहीच आठवेना. आतून प्रॉम्प्टर जोरजोरानं माझा संवाद सांगत होता. त्या ओळी प्रेक्षकांनी ऐकल्या असतील, पण मला काहीच ऐकू येत नव्हतं. असे जेमतेम दोनचार क्षण गेले असतील आणि मी नाटक अर्ध्यावर सोडून रंगमंचावरून आत निघून गेले. पडदा पडला. फजिती तर झालीच होती. माझ्या सहकलाकार मैत्रिणीची परत परत माफी मागून मी बाहेर आले, तेव्हा प्रियाही निघून गेली होती.

विस्मरणाच्या खोल गर्तेत गाडून टाकावा, असाच हा टोचणारा बोचणारा प्रसंग. नंतर त्याची टोचणी उरली नाही, ह्याचं सर्व श्रेय मी प्रियाला देईन; कारण ह्यानंतर काही दिवसांनी आम्ही कुठेतरी एकमेकींसमोर आलो, तेव्हा पूर्वीसारख्याच मोकळेपणानं तिनं माझ्याशी बोलायला सुरुवात केली. नाटकाचा तो अप्रिय प्रसंग जणू काही घडलाच नव्हता. आमच्यातला आपलेपणाचा संवाद मागच्या पानावरून पुढे, असा सहजरित्या चालू राहिला, वर्षानुवर्षं.

❍

सईंनी आपल्या भ्रमंतीच्या अन् स्वप्नरंजनाच्या
विविध आविष्कारांना शब्दबद्ध करून
साकारलेलं हे कोलाज म्हणजे -

सयसंगत

सई परांजपे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. स्वतंत्र)

मिस्कील आणि मनस्वी. प्रेमळ आणि फटकळ.
नर्मविनोदी आणि स्पष्टवक्ती. आग्रही आणि पारदर्शी.
सईंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू
उलगडणारे आत्मकथन!

सय माझा कलाप्रवास

सई परांजपे

आवृत्ती सातवी । किंमत : ₹ ५००/- । (ट.ख. स्वतंत्र)

चंदेरी-सोनेरी

सोन्याचांदीहून मोलाची असतात ती आपल्या आयुष्यावर प्रभाव टाकणारी माणसं. ती नकळत आपल्या आयुष्याचा भाग होतात. त्यांच्या परिसस्पर्शानं आपल्या आयुष्याचं सोनं होतं. विलास शेळके यांनी अशीच शब्दचित्रं चितारलीयत. अशाच एका व्यक्तित्वाची ओळख वाचकांना येथे होईल... 'ते नयन बोलले काहीतरी...' या लेखाचा हा संपादित अंश...

ते नयन बोलले काहीतरी...

डिसेंबर १९७९. मनमाड रेल्वे स्टेशनवरची हाडं गोठवणारी थंडी. रात्रभर स्टेशनवरच्या प्लॅटफॉर्मवर मी आणि माझा मित्र बाबूराव कुडकुडत होतो. हात-पाय गारठून थंड पडलेत की फलाटाच्या कोपऱ्यावर हमालांनी पेटवलेल्या शेकोटीवर हात-पाय शेकत परत येऊन थंडगार बाकावर बसत होतो. शेकोटीभोवती जमलेल्या लाल डगलेवाल्या हमालांनी आमच्याकडे आधी आश्चर्याने पाहिलं. एवढ्या थंडीत अख्ख्या फलाटावर आम्ही दोघेच प्रवासी होतो. त्यांच्या ''पंचवटी १२१० अप, काशी २७ डाऊन'', 'गाडी आली-गेली' अशा गप्पा चालू होत्या. एकीकडं आम्हा दोघांच्या माझ्या जीवनाच्या प्रवासाच्या अप-डाऊनच्या गप्पा. 'जवानी की रेल चली जाय रे!' बाबूराव मला पटवत होता. 'आपण चूकच केली. असं करायला नको होतं. चूकच झाली. काय बिघडलं असतं आपण लगेच होकार दिला असता तर?' माझाही पुरता गोंधळ उडाला होता. पण प्रश्न उभ्या आयुष्याचा होता. असं आयुष्याचे निर्णय कोणा दुसऱ्याच्या सोयीसाठी कोणी घाईघाईनं घेतं का? पण मला तर मुलगी आवडली होती! मग मी कशासाठी लांबवत होतो? मला त्या मुलीचा गोड हसरा चेहरा सारखा आठवत होता. तिच्यावर आपण अन्याय केल्याची अपराधाची भावना मनात येत होती.

झालं असं होतं, आज मी माझ्यासाठी मुलगी बघायला कोपरगावला गेलो होतो. माझ्या मोठ्या बहिणीच्या म्हणजे मंदाआक्काच्या सासरकडच्या नात्यातली. म्हणजे माझ्या मेहुण्यांची मामेबहीणच. मला इंजिनिअरिंगची डिग्री मिळवून चार वर्षं झाली होती. वडील आणि मी दोघंच घरी राहात होतो. आई जाऊन सहासात वर्षं झाली होती. आई गेल्यावर धाकटी बहीण रेखाताईचं लग्न वर्षभरात मीच लावून दिलं होतं. मी त्यावेळी इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षाला शिकतच होतो. पण वडिलांनी त्यावेळी सत्तरी ओलांडली होती. माझं शिक्षण स्कॉलरशिप आणि आमच्या वाड्यातल्या खोल्या भाड्यानं दिल्या होत्या त्या तुटपुंज्या उत्पन्नावर चालत होतं. पहाडीवरून पडून पाय मोडल्यामुळे वडिलांनी गवंडीकाम करणं थांबवलं होतं. म्हणजे आम्हीच त्यांना थांबवलं होतं. आमचं न ऐकता तपोवनातील लक्ष्मी-नारायण मंदिराच्या तीन कळसांचं काम, परत उंच पहाडीवर चढून त्यांनी केलंच होतं. पाय मोडल्यामुळे, ते त्यांचं शेवटचं काम ठरलं. मात्र मी माझ्या मित्रांच्या मदतीनं कर्त्यापुरुषासारखं बहिणीच्या लग्नाचं कर्तव्य पार पाडलं होतं. मोठ्या बहिणीचं लग्न तर मी सातवीला असतानाच वडिलांनी लावून दिलं होतं.

आता फक्त माझं लग्न लागायचं बाकी होतं. माझं शिक्षण होईपर्यंत दादा एकटे असल्यामुळे त्यांच्या आणि नंतर मी पुण्याहून शिक्षण पूर्ण करून आल्यावर आम्हा दोघांच्या खाण्या-पिण्याची सोय व्हावी यासाठी काही वर्षं मोठी बहीण मंदाआक्का

आणि धाकटी बहीण रेखाताई आळीपाळीने आमच्या घरी, म्हणजे माहेरी थांबल्या होत्या. माझे दोघेही मेहुणे खूपच समजूतदार असल्यानं हे जमलं होतं. पण असं किती दिवस चालणार? त्यांनाही त्यांचा संसार, मुलंबाळं-सासर होतंच की! मग माझ्या लग्नाचा प्रश्न ऐरणीवर आला. माझ्याबरोबरच्या सगळ्याच मित्रांची लग्नं झाली होती. माझा जिवलग मित्र बाबूराव तर एक मुलाचा बापही झाला होता. मी मात्र 'खाईन तर तुपाशी' असा हट्ट करून 'लग्न करीन तर डेप्युटी इंजिनिअर झाल्यावरच' अशा हट्टापायी लोकसेवा आयोगाची स्पर्धा परीक्षा होण्याची वाट बघत बसलो. तात्पुरती म्हणून रिझल्टच्या आधीच ज्युनिअर इंजिनिअरची नोकरी धरली होती. तीदेखील गावातच. त्याआधी मुंबईला जाऊन गगनचुंबी इमारती बांधण्याचं स्वप्न बघितलं होतं. पण वडिलांच्यामुळे ते सोडलं होतं. आता गॅझेटेड अधिकारी होऊनच लग्न करायचं, हे नवं स्वप्न बघत होतो. पण दुर्दैवाने आधी आणीबाणी आणि नंतर 'झिरो बजेट' यामुळे तेही फसलं होतं.

त्यातल्या त्यात पाटबंधारे खात्यात असूनही मला माझ्या आवडीचं अगदी गगनचुंबी नसल्या तरी भव्य इमारती बांधण्याचं खानदानी काम मिळालं होतं. त्या कामाच्या आनंदात आणि स्पर्धा परीक्षेच्या परीक्षेत चार वर्षं निघून गेली होती. इकडे वडिलांचं वय वर्ष ऐंशी झालं. त्यामुळे आता जास्त वाट न बघता परिस्थितीला शरण जाऊन लग्न करायचं या दबावामुळं मी मुलगी बघायला आलो होतो. खरं तर मला असं मुलगी बघणं पटत नव्हतं. अगदीच अमानुष वाटत होतं. पण दुसरा पर्याय नव्हता. माझं कुणावर प्रेमबीम नव्हतं. आणि असतं तरी प्रेमविवाह करायचं धाडस माझ्यात नव्हतं. त्यामुळे मी या पारंपरिक मार्गानंच जायचं ठरवून, आज या मुलगी बघण्याच्या कार्यक्रमाला आलो होतो. सोबत माझे अनुभवी मित्र (म्हणजे विवाहित मित्र) बाबुराव, चंद्रकांत, शांताराम होते. शिवाय माझे मेहुणे शशिकांत आणि त्यांचे धाकटे बंधू चंद्रकांत म्हणजे माझे धाकटे मेहुणेही होतेच. एवढी फौज घेऊन आम्ही गेलो.

कविकुलगुरू कालिदासाचे 'मेघदूत' हे खंडकाव्य
म्हणजे अभिजात गीर्वाणभाषेचा एक अनुपम अलंकार!
कालिदासाच्या 'मेघदूता'चा जणू 'सीक्वेल' म्हणजे
या दूताच्या प्रवासाचे वर्णन करणारे...

मी सखा मेघदूत

हर्षदा पंडित

किंमत : ₹ १८०/- । (ट.ख. स्वतंत्र)

खरं सांगायचं तर मी मुलीला आणि मुलीनं मला एक-दोनदा माझ्या बहिणीच्या घरी पाहिलं होतं. पण ते अनौपचारिकपणे, म्हणजे त्यावेळी लग्नाचा विषय किंवा विचार नसताना. मी बहिणीच्या घरचा अरुंद जिना चढत होतो आणि ती उतरत होती. ती माझ्याकडे बघून ओळख असल्यासारखे गोड हसली. तिचे ओठ फूल उमलावे तसे उमलले आणि दातांच्या शुभ्र पंक्ती चमकल्या जणू कुंदकळ्या. तिचे तपकिरी किरमिजी डोळे थेट माझ्या डोळ्यांमध्ये मिसळले आणि ती लाजून बाजूला होऊन अंग चोरून झपाझप पायऱ्या उतरून खाली गेली.

मीपण उत्सुकतेनं कोण ही मुलगी विचारत वरती सज्जामध्ये येऊन खाली पाहिलं. तिनं खाली उभ्या असलेल्या तिच्याचसारख्या दिसणाऱ्या छोट्या बहिणीचं बोट धरलं आणि ती झपाझप चालू लागली. पाठीवर नागिणीसारखी वेणी तिच्या नागमोडी चालीवर कधी उजवीकडे तर कधी डावीकडे लोंबकळत होती. पुढच्या वळणावर तिनं परत एकदा सहज वळून वर बघितलं. मला सज्ज्यात उभा बघून ती अशी काही लाजली, की माझ्याही हृदयात कालवा-कालव झाली. अगदी 'ते नयन बोलले काही तरी' सारखी! याआधी माझ्याकडे बघून बऱ्याच मुली हसल्या होत्या, ही काही पहिली मुलगी नव्हती, तरीपण माझ्या हृदयात कालवा-कालव होणारी ही पहिलीच मुलगी होती. कारणही तसंच होतं.

गोरा गहू वर्ण. मध्यम उंची. मोहक चेहरा अगदी माझ्या आवडीच्या 'साधना नटीसारखा', तसेच डोळे, हळूहळू उमलणारे ओठ आणि शुभ्र दंतपंक्ती. असं सगळं मनासारखं असताना आज या औपचारिक बघण्याच्या कार्यक्रमात मात्र ती वेगळीच दिसली. तिला चांगलं दिसण्याच्या म्हणजे दाखवण्याच्या नादापायी तिच्या मोठ्या बहिणीनं तिचा मेकअप केला होता. जो आवडला नव्हता. तिला नेसवलेली टिकल्या-टिकल्यांची मारवाडी साडी मला अजिबात आवडली नव्हती.

बरं, ती साडीही तिला सावरता येत नव्हती. त्यात डोक्यावरून पदर घेतल्यामुळं

गुणवंत माणसांच्या परीसस्पर्शानं
आपल्या आयुष्याचं खऱ्या अर्थानं सोनं होतं!
स्वत:च्या झळाळत्या तेजानं बरोबरच्या आयुष्यांनाही
लखलखवणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची तेजाळ शब्दचित्रं.

चंदेरी-सोनेरी

विलास शेळके

किंमत : ₹ २५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

तर तिची अगदीच काकूबाई झाली होती. बघायला आलेल्या पाहुण्यांच्या फौजेचं दडपण आल्यामुळं ती बावरून रडवेली झाल्यासारखं वाटलं. खरंच, हा कालबाह्य झालेला मध्ययुगीन प्रकार किती अमानुष असतो याचं मला प्रत्यंतर येत होतं. कारण माझादेखील हा पहिलाच प्रसंग होता. या पद्धतीनं दहा-वीस मुली बघणाऱ्या वीरांची मला चीड आली आणि बिचाऱ्या मुलींची कीव! मग मी काही प्रश्न विचारले नाहीत. ही औपचारिकतादेखील आमच्या मित्रांनीच पुरी केली. त्यामुळे तिला ऐकता-बोलता येतं याची खात्री झाली एवढंच! तिनं चहा-पोहे दिले. जाताना पदर सावरून ती ज्येष्ठतेनुसार पाया पडत माझ्यापर्यंत आली. मी झटकन पाय मागे घेतले. पण नकळत हात आशीर्वादासाठी तिच्या डोक्यावर गेले. तिनं धीटपणे माझ्या डोळ्यांमध्ये पाहिलं आणि ती माजघराचा पडदा सरकवून पडद्याआड गेली. आम्ही निरोप घेऊन निघालो. निर्णय कळवतो सांगितलं आणि बहिणीकडे आलो. मित्रांनी, मुलगी लहान असली तरी सुंदर आहे सांगितलं. बाकी निर्णय माझ्यावर सोपवून ते गेले. मी आणि बाबूराव तेवढे राहिलो. बाबूराव माझ्या बहिणीशी आणि मेहुण्यांशी बोलत होते. तेवढ्यात तिकडून निरोप आला. लग्न पक्के समजून रुपया-नारळ करायचं का? मला हे अगदी अनपेक्षित होतं. मला विचार करायला वेळ हवा होता, म्हणूनच तर निर्णय नंतर कळवतो सांगून, आम्ही निरोप घेतला होता. मग एवढी घाई कशासाठी? मी नाही म्हटलं आणि नंतर कळवतो म्हणून बाबूराव आणि मी परत निघालो.

मनमाड स्टेशनवरच्या त्या थंडगार, रक्त गोठवणाऱ्या रात्रीनं मला जागं ठेवलं. मला विलक्षण अपराधी वाटत होतं. त्या मुलीचा म्हणजे भारतीचा निरागस चेहरा आणि तिचे बोलके डोळे आठवून मी माझा होकार कळवायला हवा होता, असं सारखं वाटत होतं. घरी आल्यावर बाबूरावांनी वडिलांच्या कानावर माझी पसंती आणि होकार सांगून टाकला. ते म्हणाले, ''अरे, त्या मुलीचा बाप जगन्नाथ साक्षात बालगंधर्वासारखा

हे छोटेखानी लेख म्हणजे जणू सोनचाफ्याची फुलंच.
त्यांचा सुगंध जसा मन मोहरवून टाकतो,
तसे हे लेखही सात्त्विक समाधान देणारे,
चौफेर संचार करणारे, प्रेरणेच्या पणत्या
पेटवणारे आणि भावविश्व समृद्ध करणारेही!

ओंजळीतील चाफा

स्वानंद मुकुंद कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. स्वतंत्र)

देखणा आहे, मग त्यात काय बघायचं होतं? हातच्या कंकणाला आरसा कशाला? शिवाय पोरगी सायन्स कॉलेजात शिकतेय, म्हणजे हुशार असणारच. आणखी काय हवंय तुझ्या मित्राला?'' त्यांच्या चेहऱ्यावर समाधान तरंगत होतं. पण तिकडे माझा होकार कळवण्याच्या आत, इकडे दोन महिन्यांत वडिलांचं निधन झालं. माझी बढती झाली होती. पण बदली कोकणात अलोरे येथे लांब झाली होती म्हणून मी हजर झालो नव्हतो. वडील जाताना माझी बढती आणि लग्नाची पसंती या दोन्ही गोष्टींचं समाधान घेऊन गेले. वडिलांच्या निधनामुळं परत एकदा लग्नाचा विषय मागे पडला. मीपण दूर कोकणात अलोऱ्याला रेस्ट हाऊसवर एकटा राहू लागलो भुतासारखा.

दिवस कामाच्या गडबडीत जाई पण रात्र खायला उठे. टेकडीवरच्या त्या रेस्टहाऊसवर मी रात्री उशिरापर्यंत एकटाच गाणी ऐकत तळमळत असायचो. 'दिन ढल जाये हाये, रात न जाये'...अशी गत झालेली. वडील गेल्यानंतर वर्षाच्या आत लग्न करायचं म्हणून परत सगळ्यांनी उचल खाल्ली, त्यातही बाबूरावांनी माझं पालकत्व स्वीकारलं आणि माझ्या सासऱ्यांची भेट घेऊन होकार कळवून पुढचं सगळं ठरवलं. १४ फेब्रुवारी १९८१ला आमचं लग्न झालं. लक्ष्मीच्या पावलांनी भारती घरात आली. येताना गाडीमध्ये रडून थकलेल्या भारतीनं माझ्या खांद्यावर विश्वासानं डोकं टेकवलं आणि ती गाढ झोपी गेली. त्यावेळी, प्रथमच कोणीतरी आपलं समजून खांद्यावर विश्वासानं डोकं टेकवल्याची मलाही सुखद जाणीव झाली, तसंच लग्नामुळे येणाऱ्या नव्या जबाबदारीची. सकाळी जाग आली त्यावेळी भारती हातात लक्ष्मी म्हणजे केरसुणी घेऊन घर-आंगण झाडून साफ करत होती. पहिल्याच दिवशी ती माझी गृहलक्ष्मी झाली होती. पहिल्याच दिवशी तिनं माझ्या घराला स्वत:चं समजलं होतं. जणू ती मनाने या घराचीच मालकीण खूप आधीच झाली होती. मला तिच्या या आपुलकीचं नवल वाटलं. मी तिला विचारलं, त्यावर ती म्हणाली, ''त्यात काय एवढं, मी जेव्हा तुम्हाला पहिल्यांदा बघितलं, तेव्हाच मी तुमची झाली होते. मला तुमचे हे घारे डोळे खूप आवडले होते. मी बाकी तुमचं वय, पद, शिक्षण काही पाहिलं नव्हतं. या डोळ्यांसाठी मी या घरात आले. अन् या घरासाठी माझं सर्वस्व वाहीन.''.. भारतीचे हे विचार ऐकल्यावर मात्र मला तिच्याशी शतजन्माची लग्नगाठ बांधली गेल्याचं वाटलं. माझे हे वडिलार्जित, विलायती घारे डोळे कुणाचं आयुष्य बदलून टाकतील असं कधी वाटलं नव्हतं. पण या दोन डोळ्यांनी आमच्या दोघांचंही आयुष्य बदललं होतं. 'ते नयन बोलले काही तरी'... असं म्हणत भारतीनं या डोळ्यांच्या पापण्यांमध्ये आयुष्यभर राहण्याचं मान्य केलं आणि मी तिच्या किरमिजी डोळ्यांच्या पापण्यात!

❍

हिरवी पोर्ट्रेट्स

'हिरवी पोर्ट्रेट्स' हा ललित लेखसंग्रह म्हणजे कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा. पुरुषोत्तम बेर्डे यांच्यातील लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार- पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची प्रेरक कहाणी या ललित लेखांमधून वाचकांसमोर उलगडते. त्याचेच हे एक उदाहरण...

स्वानंदमळा

आपल्या मोटरसायकलवर बसून निघून गेला आणि अर्ध्या तासाने परत आला. त्याला सोडून तिथल्या सगळ्यांना मी ओळखत होतो. हा नवीन पिढीतला मुलगा कोण – असा प्रश्न पडेपर्यंत शेखर शेट्येने मला त्याची ओळख करून दिली, ''हा स्वानंद विजय शेट्ये, पोल्ट्रीवाले विजय शेट्ये यांचा मुलगा. सध्या याची वरच्या बाजूला असलेल्या खालच्या वाडीत, भरडावर नर्सरी आहे. ह्यानंच ती डेवलप केलेय. शुभांगी नर्सरी.''

त्या हिरव्यागार नर्सरीचे कोडे अशाप्रकारे उलगडले. जीन्स आणि सफेद टी शर्ट घातलेला तो तरुण प्रचंड उत्साहाने माझ्याशी बोलू लागला, ''पुरूकाका, घाई नसेल, तर रामजन्मानंतर माझ्या नर्सरीवर या ना.'' मी जणू आमंत्रणांची वाटच पहात होतो. देवळातला उत्सव संपताच त्या छोट्याशा घाटीवरून मी माझ्या गाडीने निघालो. पुढे त्याच्या मोटरसायकलीवर तो होता. स्वानंद.. नावाप्रमाणे स्वत:च्या आनंदात मश्गूल. त्या नर्सरीसमोर तो थांबला, मी गाडीतून उतरलो आणि त्याच्या भल्यामोठ्या नर्सरीत शिरलो. शेकडो छोटी छोटी झाडे रांगेत मांडून ठेवली होती. स्वानंद नावानिशी त्या झाडांची ओळख करून देऊ लागला. माझे पाय आपोआप त्याच्यामागे ओढले जाऊ लागले. नंतर त्याच्या लक्षात आले, आपण पाणीसुद्धा विचारले नाही. त्याच्या एका गड्याने विहिरीतले छान पाणी आणून दिले. त्याबरोबर गुळाचा एक खडा.

''पुरुकाका, ही तिथपर्यंत दिसते; ती आमची बाग.'' याला बाग म्हणणे म्हणजे मुंबईतल्या हँगिंग गार्डनला कुंडी म्हणण्यासारखे होते. प्रचंड लांबपर्यंत पसरलेला परिसर होता तो. हायवेवरून तर फक्त हिरवी नर्सरी दिसत होती. मी आत पाहतो, तर लांबपर्यंत विविध प्रकारची झाडे आणि कलमे व शेतीही दिसत होती. ''हे सर्व मी गेल्या दहा-बारा वर्षांत डेवलप केलंय.. आणि ती समोर पोल्ट्री, आणि बाजूला गुरांचा वाडा, दहा गाई आणि पंचवीस म्हशी आहेत. शिवाय बैलजोड्या, आणि तो तिथे ट्रॅक्टर.'' त्याचा उत्साह आणि लिस्ट बघून मी दडपून गेलो.

तिथल्याच एका सावलीतल्या पारावार मी बसलो. ''ही इथे रांगेत दहा झाडं दिसतयात ना, ती काळी मिरी लावलेय, या वर्षी मसाल्याचं उत्पन्न काढायला सुरुवात करतोय, तिकडे हळद आणि इकडे मिरच्या. तिकडे खाली जी रांग दिसते झाडांची, ती काजूची झाडं आहेत आणि त्याच्या खाली आंब्याची कलमं, सगळी रत्नागिरी हापूसची आहेत. तिथून पुढे खालच्या बाजूला भातशेती, आता आणखी विहिरी खणून बारमाही शेती करायचा विचार आहे.'' बाप रे, स्वानंदने माहितीचा धडाका लावला. ''जाऊ या खाली बघायला?'' नाक्यावर राऊंड मारायला जाऊ या का – अशा थाटात त्याने विचारले, मीही त्याला दुखवू नये म्हणून 'हो' म्हणणार, एवढ्यात त्याला विचारले, ''किती वेळ लागेल?''

''फार नाही, तासभर लागेल सगळं बघायला, बारा एकरचा परिसर आहे सगळा.''

मी हातानेच 'नको' म्हटले, दुपारच्या कडक उन्हात तो काश्मीरला असल्यासारखा फिरत होता आणि मी सहारा वाळवंटात असल्यासारखा.

''फोटो वगैरे नाहीत काय?'' मी आपला सोयीचा प्रश्न विचारला.

''चला, आपण घरी जाऊन पन्हं किंवा कोकम सरबत घेऊ या.''

एवढ्याशा फिरण्याने माझी दमछाक झाली होती. कपिल देवच्या नवीन बॉलवर बॅटिंग करावी, तशी माझी अवस्था होती. स्वानंदाचा उत्साह मात्र दांडगा होता. ''मी दिवसभरात चार फेऱ्या मारतो या बागेत.''

''बाईकनं ना?''

''नाही, चालत'' पुन्हा एक वाईड बॉल आला.

''चालत? बारा एकर?''

''तेवढं करावंच लागतं, गडीमाणसं राबत असतात, त्यांना गाईड करावं लागतं.''

मीही अगदी कृषितज्ज्ञ असल्यासारखी मान हलवली, ''हो तर, अगदी बरोबर.''

तेवढ्यात एक साताठ वर्षांची छोटी मुलगी आणि एक तरुणी कोकम सरबत आणि आंबेवड्या घेऊन आली.

''पुरूकाका, ही माझी मुलगी हर्षला आणि ही पत्नी मौसमी.''

''हे सगळं तू गेल्या दहा वर्षांत उभं केलस?''

''हो, काका, पंधरा-सोळा वर्षांपूर्वी मी नोकरी सोडली. मी राजापूरला शिकलो, बीएससी (फार्मा) झाल्यावर मी एमआरची नोकरी केली. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हा पिंजून काढला, त्या दरम्यान दुसऱ्या बाजूनं शेतीविषयक शिक्षणही झालं. माझा एक मित्र कृषिपदवीधर आहे आणि एक वकील. घरच्यांच्या आग्रहाखातर आम्ही नोकऱ्या केल्या आणि एके दिवशी ठरवून त्या सोडल्यादेखील. त्यांच्याबरोबर

पुरुषोत्तम बेर्डे यांच्यातील लेखक - दिग्दर्शक - चित्रकार - नेपथ्यकार - पार्श्वसंगीतकार - जाहिरात कलाकार - वाद्यवृंदकार कसा घडत गेला, नावारूपाला आला याची ही प्रेरणादायक कहाणी.
कोकणच्या अंत:स्पंदनांची रम्य स्मरणयात्रा.

हिरवी पोर्ट्रेट्स

पुरुषोत्तम बेर्डे

किंमत : ₹ २८०/- । (ट.ख. स्वतंत्र)

भागीदारीत काजूप्रक्रियेची फॅक्टरी काढली बोरथड्याला, पण त्यात विशेष यश मिळालं नाही. काजू कमी पडला नि भांडवलही. मग आम्ही सेपरेट झालो. तेवढ्यात मी माझ्या गावात एक एकरमध्ये माझ्या वडिलांची पोल्ट्री जी बंद पडली होती, ती नव्यानं सुरू केली आणि उरलेल्या भागात आईच्या नावानं 'शुभांगी' नर्सरी सुरू केली. चार वर्षं जिल्ह्यांमध्ये जी पायपीट केली आणि शेतीविषयक ज्ञान मिळवलं, त्या जोरावर यश मिळालं, नशिबानं साथ दिली आणि नर्सरीच्या पुढे पसरलेल्या डोंगरात आमची बारा एकर पडीक जमीन होती, तिची मशागत सुरू केली, आज ती चांगलीच फुलून आलेय, बारा-पंधरा लोकांचा स्टाफ आहे. त्यांची कुटुंबंसुद्धा हीच शेती पोसते, अगदी लॉक-डाऊनमध्येही कामं बंद नाही झाली, निसर्गानं 'कोविड' फेकून दिला आणि आम्ही सर्व त्याला सामोरं गेलो, शिवाय घरात डॉक्टर आहेच.''

पुढचा धक्का मोठा होता. स्वानंदची बायको मौसमी ही डॉक्टर आहे. डॉ. मौसमी बीएएमएस आहे. शेजारचे गाव कुवे आणि वाकेड इथे ती सकाळ-संध्याकाळ रुग्णसेवा करते. आजपर्यंत या खेडेगावात कुणी डॉक्टर टिकले नाहीत, आजही तालुक्याच्या गावात किंवा जिल्ह्याच्या हॉस्पिटलशिवाय चांगले डॉक्टर किंवा हॉस्पिटल नाहीत. मला या तरुण जोडप्याचे कौतुक वाटले.

''हर्षला इथल्याच जवळच्या 'ओणी'च्या शाळेत शिकते, नुकतंच तिथे एक इंटरनॅशनल स्कूल सुरू झालंय.''

''वा... छान... लव्ह मॅरेज?'' मी आश्चर्याने प्रश्न विचारला.

''हो किंवा दोन्ही, हिनं वेंगुर्ल्यात मेडिकल शिक्षण पूर्ण केलं आणि माझाही मेडिकल व्यवसाय, त्यामुळे तेव्हा ओळख झाली आणि मग घरून संमती मिळून आम्ही लग्न केलं, तेव्हा मीही नुकतीच नर्सरी सुरू केली होती.''

स्वानंद हा कोकणातला तरुण शेतकरी आहे. इथल्या सुजलाम सुफलाम जमिनीचा आणि पावसापाण्याचा पूर्ण फायदा घेतोय, नव्या नव्या योजना राबवून शेती वाढवतोय. हायवेला लागून असलेल्या त्याच्या जागेत त्याने नंदनवन फुलवलेय.

भारतीय रिझर्व्ह बँकेची स्थापना, आजवरचा प्रवास, भूमिका आणि कार्यपद्धती, भारतासारख्या खंडप्राय विशाल देशाच्या वाटचालीत असलेला महत्त्वपूर्ण सहभाग यांचा रोचक इतिहास, तोही अत्यंत रंजक पद्धतीने...

गोष्ट रिझर्व्ह बँकेची

विद्याधर अनास्कर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ५५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

अभिनंदन!

पुणे मराठी ग्रंथालय साहित्य पुरस्कार २०२६

साहित्यसम्राट न. चिं. केळकर पुरस्कार

वसुंधरेचे शोधयात्री

डॉ. अनुराग लव्हेकर

निर्मला मठपती फाऊंडेशन, सोलापूर
राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट साहित्य पुरस्कार २०२६

गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर



गोमंतकाच्या हिरव्यागर्द शेताभाटांत वाढलेल्या; पावसापाण्यात, पागोळ्यांत मनसोक्त भिजलेल्या एका निसर्गवेड्या मनस्वी मुलीच्या जडणघडणीच्या आणि व्यावसायिक स्थैर्याच्या प्रवासातील हे कटू-गोड जीवनानुभवांचं तिच्या भावओंजळीत उरलेलं निवळशंख पाणी...
वाचकांची जीवनमूल्यांवरील श्रद्धा दृढ करणारं !

निवळशंख पाणी

डॉ. रेवा दुभाषी

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. स्वतंत्र)

''पुरुकाका, ही डाव्या बाजूला जमीन दिसतेय, तिथे ॲग्रो टुरिझम सुरू करायचंय, टुरिस्ट बंगल्यांची स्कीम राबवणार आहे, तोपर्यंत हाय वे पूर्ण होईल, अगदी लेफ्ट टर्न घेतला; की शंभर फुटांवर माझं ॲग्रो टुरिझम..'' स्वानंदच्या डोळ्यांमधल्या स्वप्नांना अंत नव्हता. 'गावाकडे चला' म्हणणाऱ्यांना स्वानंदने आणि त्याच्या बायकोने चोख उत्तर दिले. ते गावातच आहेत, अगदी खेडेगावात. त्यांचा एक हात वनश्रीमध्ये रमलाय व पाय जोताच्या बैलांसारखे अखंड शेतीत राबतायत, तेही आधुनिक तंत्र वापरून.

उजवीकडे रत्नागिरी, कोल्हापूर, पुणे-मुंबईसारखी शहरे; तर डावीकडे कणकवली, सावंतवाडी आणि गोवा. पण खेडेगाव सोडून शहरात जाऊन स्थायिक होण्याचा विचारसुद्धा मनात नाही. आज ज्या काळात पुण्या-मुंबईतले आई-वडील आपली मुले इंग्लंड-अमेरिकेत सेटल झालेली मोठ्या अभिमानाने सांगतायत, त्या काळात स्वानंद आणि मौसमीसारखी आजची तरुण पिढी कोकणातल्या अनेक खेड्यांमध्ये कामानिमित्त सेटल होताना दिसते. ना त्यांना मॉलचे आकर्षण, ना सिनेमाथेटरांचे. अगदी पहाटे पाच वाजता उठून आपल्या नर्सरीतली सकाळ सुरू करून रात्रीपर्यंत कामात बुडवून घेणारी ही गावातली पिढी आणि त्याच वेळी मोठ्या शहरातली ओटीटीवरच्या लांबलचक सीरियल बघण्यात गुंतलेली आजची पिढी. डॉक्टर मौसमीच्या दवाखान्याचा आधार रात्री-अपरात्रीही पंचक्रोशीतल्या गावांना आहे. आणि त्याच वेळी आजूबाजूच्या गावातल्या शेतकऱ्यांना आपल्या अनुभवांचा मोलाचा सल्ला देऊन स्वानंद एकूण आजूबाजूची हिरवळही वाढवत आहे.

अस्वस्थपणे तेलाच्या घाण्यावरच्या बैलांसारखे नोकरीच्या फेऱ्यात गोल गोल न फिरता, शहरांची आणि परदेशाची आकर्षणे नाकारून एक पिढी शहाणी होऊन शेतातल्या नांगराचे 'जोतं' हातात धरून हिरवळ उगवते आहे, त्याचा फुलोरा काही वर्षांत नक्कीच दिसेल.

❍

आपल्याही नकळत आपल्या रोजच्या जगण्याचा
भाग झालेल्या टीव्ही मालिका. त्याबद्दल स्वत:ला आणि
प्रेक्षकांना पडणाऱ्या अनेक प्रश्नांची उत्तरं देणारं,
'मालिका' या विषयावर मार्गदर्शन करणारं पुस्तक...

टीव्ही, मालिका आणि बरंच काही...!

मुग्धा गोडबोले

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. स्वतंत्र)

सो कुल... टेक २

सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी उघड्या डोळ्यांनी जग पाहत माणसांना वाचलं आणि शब्दांमधून त्यांचं व्यक्तिचित्र रेखलं. अशा संवेदनशील आणि संवादोत्सुक अभिनेत्रीला रंगभूमीवर, पडद्यावर पाहण्या - ऐकण्याएवढंच वाचनही किती लोभस असू शकतं त्याचा हा अनुभव....

आधी स्वत:वर प्रेम करा!

ती म्हणते, 'शेजाऱ्यावर स्वत:प्रमाणेच प्रेम करा..' ह्यात काय नवीन आहे? असले बोअरिंग उपदेश करणं काय अवघड आहे? पण एक मिनिट.. तिचं वाक्य पूर्ण ऐका - 'आणि शेजाऱ्याच्या आधी स्वत:वर प्रेम करा. सर्व गुणदोषांसकट स्वत:ला स्वीकारा. स्वत:कडे मायेने बघा. तरच तुम्ही बाकीच्यांवर खरं प्रेम करू शकाल.'

पाच वर्षांपूर्वी भाऊबीज म्हणून संदेशनं 'यू कॅन हील युअर लाइफ' हे पुस्तक मला दिलं.. आणि माझ्यापुरतं अस्ताव्यस्त झालेलं, चकवणारं, फसवणारं माझं आयुष्य मला वेगळंच दिसायला लागलं. या पुस्तकाची लेखिका लुइस एल. हे - आता आमच्या घरातलं माणूस झालीए. अतिशय सोप्या भाषेत लुइसने तिचे अनुभव आणि निष्कर्ष मांडले आहेत.

आता आपण आहोत ती परिस्थिती, भोवताल, माणसं, त्यांच्यातले भावनिक संबंध- हे सगळं आपण घडवत असतो. ते चांगले/वाईट जसेही असोत - आपण स्वत: निर्माण केलेले असतात. हे चित्र बदलायचं असेल तर त्याची जबाबदारी घेऊन एकच गोष्ट अंगी बाणवली पाहिजे - इच्छा. कारण इच्छा तिथे मार्ग. आपण चित्र बदलू शकतो. त्यात रंग भरू शकतो, मूड बदलू शकतो किंवा न बसणारा एखादा सूर गाळूही शकतो.

आपण प्रवाही असलो तर आपल्या पाण्याला वाट मिळते. एखादी गोष्ट शिकायची असेल तर कान, डोळे (आणि डोकंही) उघडे ठेवावे लागतात फक्त. पेपरमध्ये नेमक्या त्याच विषयाच्या जाहिराती येतात, डॉक्टरांकडे वेटिंगच्या रांगेत एखाद्या मासिकात लेख वाचायला मिळतो, गप्पा ऐकायला मिळतात, अनोळखी कुणाची तरी त्या विषयाबाबतीतच मेल येते..

लुइसचं हेच म्हणणं आहे की रिसेप्टिव्ह रहा. आजवर तिने हजारो, लाखो जणांचं आयुष्य बदललंय. तिला स्वत:ला चाळिशीच्या आसपास कॅन्सर झाला. ती मुळापासून हादरली. आर्थिक चणचण, दुभंगलेली नाती, आईवडिलांचं प्रेम न मिळणं, कुठल्या कुठल्या पायरीवर स्वत: केलेल्या चुका.. हे सगळं स्मृतीतून बाहेर येऊन तिच्यावर आदळायला लागलं. पण फोलपणाच्या निराश क्षणांना लुइसनं ममत्वानं आपलंसं केलं. आठवणींमधल्या भावनांचा मागोवा घेतला आणि त्याचं रूपांतर सजग विचारांमध्ये केलं. त्यामुळे त्या फक्त स्फोटक अभिव्यक्ती राहिल्या नाहीत. स्वत:ची इच्छाशक्ती पणाला लावून तिने स्वत:ला स्वीकारलं, व्यक्त होऊ दिलं आणि या प्राथमिक पायरीनंतर त्या भावनांना तिनं स्वत: दिशा दिली सकारात्मकतेची. त्यासाठी तिनं एक लाखमोलाची गोष्ट शोधून काढली- स्वत:ला माफ करण्याची. किती कोसतो आपण स्वत:ला! किती नाकारत राहतो स्वत:ला. आरशात स्वत:चं

गेली चाळीस वर्षे दिलीप माजगावकरांनी
विविध नामवंतांशी केलेला चिंतनशील
व भावगर्भ पत्रसंवाद, त्यांची विस्तृत मुलाखत,
तसेच 'दिगमा' या चतुरस्र व्यक्तिमत्त्वाला
न्याहाळणारे त्यांच्या सुहृदांचे लेख...

पत्र आणि मैत्र

दिलीप माजगावकर

दिलीप माजगावकरांनी विविध प्रसंगी प्रकाशनासंबंधी,
साहित्यकृतींविषयी केलेल्या अनुभवसिद्ध व
रसाळ भाषणांचे संकलन आणि त्यांनी
आंतरिक जिव्हाळ्याने रेखाटलेली
अनेक सुहृदांची आशयसंपन्न व्यक्तिचित्रे...

वाणी आणि लेखणी

दिलीप माजगावकर

दोन पुस्तकांच्या संचाची किंमत : ₹ १०००/-
(ट.ख. स्वतंत्र)

अनेकानेक निसर्गचित्रे रेखाटणारी
प्रसन्न शैलीतील ही आस्वादक गद्यकाव्ये!
हळव्या कविहृदयाच्या धर्मोपदेशकाने
रचलेली भावकविता म्हणजे...

सृजनाचा मळा

फादर फ्रान्सिस दिब्रिटो

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

प्रतिबिंब पाहिल्यावर आपल्या मनात काय येतं? कपाळावर बारीक आठी का येते? आपण आपले केसच तपासतो, जाडीच बघतो. सुरकुत्या न्याहाळतो.. किती वेळा आपण आपल्या प्रतिबिंबाला पसंतीची पावती देतो? नव्या दिवसाचं स्वागत प्रसन्नपणे करतो का आपण?

कितीतरी माणसं परफेक्ट वागायच्या (मॅड) तत्त्वासाठी स्वत:ला बेसुमार शिक्षा देतात. कुणाच्या नजरेत परफेक्ट व्हायचं असतं आपल्याला? त्यासाठी शिक्षा का करून घ्यायची स्वत:ला? कशासाठी अपराधी वाटून घ्यायचं? फार नशीबवान आहोत आपण की, माणूस म्हणून जन्माला आलोय. विश्व फार सुंदर आहे. आभार मानू या चराचराचे - आपल्याला नवा दिवस दिल्याबद्दल.

लुइसने माझ्यात बदललेली आणखी एक गोष्ट म्हणजे, शरीराबद्दलचा आदर. ती म्हणते, तुमचं शरीर हे खरं तुमचं घर आहे. जन्माला आल्यावर तुम्ही या शरीर नावाच्या घरी राहायला येता. त्या घराची काळजी घ्या. त्याला स्वच्छ ठेवा. त्याची निगराणी राखा. व्यसनं, औषधं किंवा निष्काळजीपणा करू नका. भानावर या. अजिबात उशीर झालेला नाही. प्रेम करण्यासाठी प्रत्येक क्षण हा नवा शुभ मुहूर्त असतो. - मग ते स्वत:वर का असेना.

आज लुइस नव्वदीच्या आसपास आहे. तिने अलीकडेच बॉलरूम डान्सिंग शिकायला घेतलंय. बागकाम तर तिला प्रियच आहे.. आणि आता ती चित्रकला नव्याने शिकणार आहे. तिच्या खूप साऱ्या ऑडिओ सीडीपण आहेत. आणि इतर अनेक पुस्तकंही. लुइसला तुमच्याही घरी आणा. आनंदाला घरी आणा.

❍

सोनाली कुलकर्णी एक गुणी अभिनेत्री. सोनाली माणसांना वाचते आणि शब्दांतून त्यांची व्यक्तिचित्रं रेखाटते. अशा संवेदनशील, संवादोत्सुक अभिनेत्रीला पाहण्या-ऐकण्याएवढंच 'वाचणं'ही किती लोभस असू शकतं, याचं उदाहरण म्हणजे...

सो कुल.. टेक २

सोनाली कुलकर्णी

आवृत्ती तिसरी । किंमत : ₹ ३५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

एक उलट... एक सुलट भाग २

सिनेअभिनेत्री अमृता सुभाष याची जीवन समजून घेण्याची असोशी, ऊर्मी, विचारपूर्वक जगण्याचं भान या लेखनातून दिसतं. घरातील नाटक-सिनेमा-चित्रं-संगीत या वातावरणात स्वत:चा आवाज शोधणं काय असतं त्याचा प्रत्यय देणारा त्यांचा हा एक लेख...

अपलक निद्राहीन

माझ्या आत दोन डोळे आहेत. वटारून बघणारे. क्षणोक्षणी. माझं काय चुकतं आहे, याच्यावर लक्ष ठेवून असणारे. काही चुकताच मोठे होणारे. रागावणारे. त्यांची खूप भीती वाटते. इतकी, की मी चुकताक्षणी एकदम कावरीबावरी होते आणि ओरडायलाच लागते. समोरच्याला वाटतं, मला राग आला आहे. पण राग नसतो तो. भीतीचं दुसरं नाव कधीकधी 'राग' असतं. आतल्या दोन वटारल्या डोळ्यांना घाबरून मी बाहेरच्या कुणावरतरी ओरडायला लागते. आतल्या वटारल्या डोळ्यांना सांगत राहते, 'मी नाही केली चूक...त्या अमुकनं केली... त्या अमुकमुळे तमुक झालं...' आता राग येणं स्वाभाविक... पण 'साधा' राग वेगळा आणि हा 'भीतीचा' राग वेगळा. हा भीतीचा हात धरून येणारा राग हा नुसता 'येत' नाही. तो एखाद्या त्सुनामीसारखा 'उसळतो' आतल्या आत. मग मी माझी राहत नाही. मी त्या उसळलेल्या त्सुनामीचाच एक भाग होऊन जाते. घाबरून मी मला जे म्हणायचं नसतं, ते म्हणून बसते. त्या म्हणण्यानी, माझ्या आतल्या त्सुनामीसारखीच त्सुनामी समोरच्याच्याही आत उसळते. तोही जे म्हणायचं नाही, ते म्हणून बसतो. दोन्हीकडून जे बाण सोडायचेच नव्हते कधी, ते सुटून बसतात; ज्या जखमा करायच्याच नव्हत्या कधी, त्या होऊन बसतात... या त्सुनामीतसुद्धा खूप हानी होऊन बसते... नात्यांची...

हे सगळं इथेच थांबत नाही. या सगळ्या गदारोळात आतल्या दोन वटारलेल्या डोळ्यांच्या भीतीनं मी त्या 'चुकलेल्या' क्षणापासून धूम ठोकून पळून जाते आणि या पळून जाण्यामुळे मी एक फार मोलाची गोष्ट गमावून बसते, ती म्हणजे 'धडा'! माझी प्रत्येक चूक खरं तर तिच्याबरोबर एक 'धडा' घेऊन आलेली असते; शिकवायला. मी तिच्यापाशी शांत थांबले; तर ती, तो धडा मला शिकवणार असते. पण माझं धूम पळणं बघून 'धडा' शिकवण्यासाठी बोलू पाहणारी ती चूक गप्प होते. एक उसासाही सोडत असावी बिचारी. कारण तिला कळलेलं असतं, तिला परत यावं लागणार... हे तर ठरलेलंच. 'चुकी'बरोबर येणारा 'धडा' शिकला नाही, की तिला परत यावंच लागतं. तिचं काम त्याशिवाय पूर्णच होत नाही. तिच्याबरोबर येणारा तिचा 'धडा' तिनं मला शिकवला. मी शिकले. 'मी शिकले' अशी तिची खात्री झाली, की मगच तिचं काम पूर्ण झालं. मग ती पुन्हा येत नाही. माझ्या अनुभवावरून सांगते, 'चूक' आणि 'धड्याचं' काम फार शिस्तशीर असतं. इतकं, की वाटतं, त्यांच्याकडे पक्कं लिहून ठेवलेलं असणार, कोणत्या चुकीनं तिचा धडा घेऊन कोणाकडे जायचं, कधी जायचं, कितीदा जायचं आणि कधी थांबवायचं. मी तो 'धडा' शिकले, की ते लगेच त्यांच्या यादीत त्या जागेसमोर टीकमार्क करत असणार! 'चूक' आणि 'धडा' फार निर्लेप असतात. मी शिकेपर्यंत ते न थकता येत राहतात. आतल्या वटारल्या डोळ्यांसारखे ते रागवत नाहीत.

आतले वटारलेले डोळे काही केल्या हसतच नाहीत. मी माझ्या मते काही 'चांगलं' किंवा 'बरोबर' केलं, की आशेनं त्यांच्याकडे पाहते. 'ते ठीक आहे, एवढं काही चढून जायला नकोय' अशा भावनेनी ते थंडच असतात. ते काहीसं छान घडलेलं, पाहिलं न पाहिल्यासारखं करतात. क्षणात पुन्हा वटारले जातात आणि म्हणतात, 'आज हे जमलं ते ठीक आहे, पण उद्याचं काय? उद्या जमणार आहे? खात्री आहे?' उद्याची खात्री कोण देणार? मी काहीतरी 'छान' केल्यानंतर जे 'चांगलं' वाटत असतं, ते क्षणात थांबवते. पुन्हा एकदा त्या डोळ्यांचा धाक घालून घेते स्वत:ला आणि कामाला लागते. आता तर मी त्या धाकाची इतकी सवय लावून घेतली आहे स्वत:ला, की माझी कुणीही, कितीही केलेली खरी, खोटी कुठलीच प्रशंसा मी आतच जाऊ देत नाही. पटकन गोड हसून मी 'थँक्यू' म्हणते खरी, पण आत काहीच जात नाही. अळवावरच्या पाण्यासारखी ती प्रशंसा मला पुसटसं चाटून भुर्रकन उडून जाते.

माझ्या नात्यातलं एक फार गोड बाळ आहे. कावेरी नावाचं. तिनं काहीही छान केलं, की तिच्या आसपासचे आम्ही सगळे तिच्यासाठी आनंदभरानं टाळ्या वाजवतो. ती त्या वेळी क्षणभर थांबते. अप्रूपानं त्या टाळ्यांकडे लोभसवाणं पाहते. तिचं त्या टाळ्यांकडे कुतूहलानं पाहणं मला फार आवडतं. त्यात कुठलाच गर्व नसतो, चढून जाणं नसतं, खोटं ओशाळं होणं नसतं, दुर्लक्ष नसतं, खूप काळ त्या टाळ्यांमध्ये गुरफटणंसुद्धा नसतं. तिला त्या टाळ्या आवडतात. ती त्या पाहते, आवडून घेते आणि पुढच्या कामाला जाते.

तिच्याही आत माझ्यासारखेच दोन डोळे आहेत. सगळ्यांच्याच असतात. पण तिच्या आतले दोन डोळे 'कुतूहलाचे' आहेत. ते अजून स्वत:लाच दटावायला शिकलेले नाहीत. तिच्या छोटुकल्या हातातनं किती काय काय सांडतं, पडतं... पण त्या 'सांडण्याबद्दल' स्वत:ला दटावत बसायला तिला वेळच नसतो. तिच्या आतल्या दोन डोळ्यांतून उतू जाणारं 'कुतूहल' त्या 'सांडण्यापाशी' न थांबता दुसरं काहीसं

हे एका शहाण्या मुलीचं मर्मस्पर्शी लिखाण आहे.
तिच्याकडे जीवन समजून घेण्याची असोशी, विचारपूर्वक
जगण्याचं भान आहे. तिच्या मनातली विचारवादळं
आणि अनुभव, यांतूनच नव्याने विणलेले...

एक उलट... एक सुलट : भाग २

अमृता सुभाष

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ २६०/- । (ट.ख. स्वतंत्र)

'उचलायला' शिकण्यासाठी कधीच पुढे निघून गेलेलं असतं. त्यामुळे ती किती काय काय, भरभर शिकते आहे... तिच्या आतल्या त्या दोन डोळ्यांची तिच्या आयुष्यातल्या 'चूक' आणि 'धड्यांशी' घट्ट मैत्री आहे.

लहानपणी कुतूहलानं इकडं तिकडं बघणाऱ्या आपल्यातल्या लुकलुक डोळ्यांना दटावत दटावत मोठं करतो आपण. मोठं होता होता कुतूहल हरवत जातं आणि दटावणंच तेवढं उरून बसतं. अवास्तव लाड नकोत मान्य, पण तसूभरही कौतुक नको? हे नाही होत आता मान्य... जे चांगलं आहे, त्याला चांगलं म्हटलं तर काय होईल? लगेच हवेत जाऊ आपण? डोक्यावर बसू? आता मोठे झालो आपण. इतक्या वर्षांत पाय जमिनीवर टिकवणं नक्कीच शिकलो. लहान मूल शिकतं ते फक्त दटावण्यानं? खरंच का? या सगळ्या प्रश्नांपाशी थांबावंसं वाटतंय. मी तरी जेव्हा जेव्हा माझं मन शांत, उत्सुक होतं; तेव्हा तेव्हाच नव्या गोष्टी आत घेऊ शकले आहे. घाबरंघुबरं मन कसं नवं शिकणार? माझ्या मनाला शिस्त लावण्यासाठी मधून मधून शांत, खंबीरपणे काही गोष्टी नक्कीच सांगाव्या लागतात त्याला. पण त्यासुद्धा शांतपणे सांगितल्या, तरच कळतात त्याला. दटावल्यानंतर फक्त पळणं होतं आणि पळून पळून शिकणं राहतं.

दटावण्यानं भीती आणि रागाच्या त्सुनामीशिवाय दुसरं काही जन्माला घातलेलं दिसत नाही मला माझ्यात आणि आसपास... हे सगळं मला हवं आहे का... झाडावरची कळीसुद्धा तिच्यावरून मायेनं हात फिरवला, तर लवकर छान फुलते म्हणतात. खरं, मनापासूनचं कौतुक हे असं असतं, डोक्यात न जाणारं... आतून हळुवार फुलवणारं. मग आतल्या दोन डोळ्यांनी आपणच आपल्याकडे, आपल्या चुकांकडे कधीतरी का होईना प्रेमळ हसून पाहिलं तर? कावेरीसाठी वाजवलेल्या निखळ भरभरून टाळ्यांपैकी एखादी तरी टाळी मी त्याच निखळपणे स्वत:साठी वाजवू शकले तर! आणि तिच्यासारखं एक क्षण का होईना अत्यंत स्वाभाविकपणे ते कौतुक माझ्या आत घेऊ शकले तर!

❍

आसपासच्या व्यक्ती, प्रसंग, घटना यांकडे चिंतनशील दृष्टीने पाहत, चित्रपटक्षेत्रातील अनेक अनुभवांना शब्दरूप देत मैत्री, निसर्ग, संगीत अशा अनेक विषयांवरचं हे लेखन... इतरांसोबतच स्वत:शीही संवाद करायला लावणारं!

सो कुल..

सोनाली कुलकर्णी

किंमत : ₹ ३७५/- । (ट.ख. स्वतंत्र)

गोंदणखुणा

एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला कधी मनोगत, तर कधी हृद्गत सांगावं तसा गोंदणखुणांचा आशय. निसर्गातील एखाद्या घटकाचा अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य, कवितेच्या चरणाशी सहज घडलेला अर्थमेळ, स्त्री संवेदनेशी जोडलेल्या घटनाप्रसंगांची चलतचित्रं किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं स्वत:ला नि:संदर्भ करून केलेलं आत्मचिंतन म्हणजे डॉ. प्रिया निघोजकर यांचे गोंदणखुणा हे पुस्तक होय. त्यांतील येथे दिलेला 'तिची दिवाळी' हा लेख त्याचा प्रत्यय देईल....

तिची दिवाळी

तिची 'त्या' वर्षीची दिवाळी काही आगळीवेगळीच होती. डोळ्यांत जणू टिपूर चांदणं चमकत होतं! नोकरीचा पहिलावहिला पगार नुकताच तिच्या हाती आला होता आणि तोंडावर होता वर्षातला सर्वांत मोठा सण-दिवाळी! मग काय, ती हरखून गेली. तिचं मानस आजवर स्वप्नात पाहिलेल्या एकेक गोष्टी ठरवण्यात गुंतलं. खरं तर प्रत्येक वर्षी तिच्या आयुष्यात दिवाळी सण आला होता. नवीन कपडे, भरपूर फटाके, घरात मोठ्या प्रमाणात फराळाचे सर्व पदार्थ आणि सणानिमित्त केलेला झगमगाट हे सारं तिनं पाहिलं होतं... पण ते आजूबाजूंच्या घरात आणि मैत्रिणींच्या कुटुंबात. वडलांचं जेमतेम उत्पन्न आणि सहा भावंडांसह कुटुंबाचा असलेला मोठा परीघ. यांतून हे सारं सुख कुठलं वाट्याला यायला! नाही म्हणायला.... अंगणात किल्ला बनवण्यात ती व तिची भावंडं दरवर्षी रमून जायची. कागदी आकाशदिवा बनवायची. अंगणात रांगोळी रेखायची. इतरांनी उडवलेल्या फटाक्यांमधील दारू कागदाच्या कपट्यावर घेऊन ती पेटवून धमाल करायची. अर्धवट जळालेले फुलबाजे उडवायची. घरात आईनं बनवलेला चिवडा आणि दामटीचे लाडू खायची. या साऱ्यांतच त्यांचा दिवाळीचा आनंद सामावलेला असायचा. दरवर्षी दिवाळीचा हाच परिपाठ. समाधान मिळत असलं, तरी इतरांप्रमाणेच आपणही या सणाच्या सुखात चिंब न्हाऊन निघावं, कशाचीही ददात भासू नये; असं तिला वाटायचं. 'हं! तेही दिवस येतील...' दिवाळीच्या दिवसांत अशी सुखस्वप्नं मिटल्या डोळ्यांत घेऊनच ती झोपायची. काळ लोटला. शिक्षणानं तिचं क्षितिज विस्तारलं. स्वत:च्या पायावर ती उभी राहिली. उराशी बाळगलेली अनेक स्वप्नं आता ती उघड्या डोळ्यांनी साकार करणार होती. केवळ भौतिक असेल, पण तो आनंद ती कुटुंबाला भरभरून देणार होती. आयुष्यात प्रथमच बँकेत पगाराचे पैसे काढताना तिला कोण आनंद झाला! कुठल्याही पहिल्यावहिल्या गोष्टीचं अप्रूप आयुष्यभर स्मरणात राहतंच आपल्या! घरी मुद्दामहून तिनं ही आनंदाची बातमी कळवली नव्हती. सर्वांनाच सुखद धक्का द्यायचा, असं तिच्या मनात होतं. शनिवारी शाळा सुटल्यावर ती थेट बाजारात गेली. आई-वडील, धाकटी चार भावंडं आणि थोरल्या लग्न झालेल्या बहिणीसाठी, तिच्या छकुलीसाठी तिनं कपडे खरेदी केले. सजावटीचं सामान, थोडे फटाके, सुगंधी उटणं घेतलं. तयार मिठाईचा पुडा घेतला. गावाकडे धावणाऱ्या लालपरीच्याही आधीच तिचं मन हे सारं सामान घेऊन घरी पोहोचलं होतं. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा हा आनंद कल्पनेनंच अनुभवताना तिच्या मनात आनंदाची कारंजी थुईथुई नाचत होती. स्वीकारापेक्षा समर्पणातला आनंद किती मोठा असतो, हे तिला जाणवत होतं. ती गावात पोहोचली, तोवर दिवस मावळला होता. पण तिच्यासाठी तर सुखाची-आनंदाची

'राजहंसी' विविधा

शिवाजी महाराजांसंबंधीच्या असंख्य कथांचे, व्यथांचे
हे अनोखे संकलन म्हणजे इतिहास, चित्रकला
आणि शिल्पकला क्षेत्रांतील मान्यवरांच्या
कार्यकर्तृत्वाला दिलेली मानवंदनाच आहे!

कथा शिवचित्रांच्या, व्यथा शिवस्मारकांच्या

सुहास बहुळकर

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ १०००/-
सवलतीत : ₹ ७५० । (ट.ख. स्वतंत्र)

नृत्य हाच श्वास... हाच प्राण... तोच मार्ग आणि
तेच गंतव्य असणाऱ्या कथक नृत्यांगना शमा भाटे
यांच्या नृत्यमय जीवनाची ही गाथा! या विदुषीचा
हा 'नाद-रूप' प्रवास म्हणजे गेल्या
पाच दशकांतील सांस्कृतिक स्पंदनेच...!

नृत्यमय जग... नर्तनाचा धर्म...

शमा भाटे

आवृत्ती दुसरी । किंमत : ₹ ७५०/- । (ट.ख. स्वतंत्र)

पर्यावरण असंतुलनाचे मूळ आहे मानवाची भोगवादी वृत्ती,
हाव आणि आक्रमकता. ही मनोवृत्ती कशी बदलता येईल?
तो बदल कसा असायला हवा? आधुनिक पाश्चात्त्य विज्ञान
व प्राचीन पौर्वात्य तत्त्वज्ञान ह्यांच्या आधारे या बदलांची
दिशा देणारं हे पुस्तक...

निसर्गायण

दिलीप कुलकर्णी

आवृत्ती चौदावी । किंमत : ₹ २९०/- । (ट.ख. स्वतंत्र)

उगवण होत होती. बहिणीची वाट पाहत धाकटी भावंडं केव्हापासूनच स्टँडवर ठाण मांडून होती. ती गाडीतून खाली उतरताच त्यांनी तिच्याभोवती एकच गलका केला.. माई आली..... केवढ्या पिशव्या! काय-काय आणलंय.... आनंद, कुतूहलमिश्रित डोळ्यांनीच सगळे घरी पोहोचले. घरात पोहोचताक्षणी भावंडांनी एकेक पिशवी उघडून पाहायला सुरुवात केली. लहानग्यांसाठी तो आनंद वस्तूंचा होता, पण तिच्यासाठी त्या सगळ्यांना आनंदी पाहण्याचा होता...तिचा आतला आनंद! आपल्या लेकरांचा तो आनंद पाहून तिच्या आई-वडलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. 'लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया...' जणू प्रत्येक जण अनुभवत होता. समाधानानं, कृतार्थ भावनेनं तिच्याही डोळ्यांच्या कडा पाणावल्या. आज पहिल्यांदाच किराणा सामानाची यादी तिच्या घरात तयार होत होती. वडलांना एकाच वेळी दुकानातून रोखीनं असं सगळं सामान घरी आणताना पाहून तिला आपल्या कमावतं झाल्याचं सार्थक वाटलं. काळोखाच्या प्राक्तनाला उजेडाचं दान मिळाल्याचं समाधान वाटलं. त्यासाठी 'पणती' होऊन पुढे सरसावताना तिला कृतार्थ वाटलं. दिवाळीच्या भवतालातल्या चैतन्याशी आपल्या आतल्या चैतन्याची सळसळ आता तादात्म्य पावल्याचं तिला जाणवलं. आनंद दिल्याच्या अनुभूतीचा तो क्षण होता. नंतरच्या काळात प्रत्येक दिवाळीला हा आनंद दुणावत गेला. सुखाची बरसात होत राहिली. कुटुंबाचा कायापालट झाला. स्वत:बरोबरच इतरांनाही दिवाळीचा आनंद भरभरून देण्यात तिनं कधीच कसूर केली नाही. आजही प्रत्येक दिवाळीत पहिली 'दिवेलागण' करताना तिला स्मरण होतं, ते त्या पहिल्या आनंदी-दिवाळीचं. आताही हे मांडताना तोच कृतार्थ भाव दाटून आहे तिच्या हृदयाच्याही अंतर्हृदयात! 'मी'चं हे साक्षीभावानं निरखणं किती सुंदर असतं!

❍

निसर्गातील अनपेक्षित साक्षात्कार, मानवी स्वभावातील अतर्क्य भावनाट्य किंवा जीवनाच्या एखाद्या प्राणसूत्राचं स्वत:ला नि:संदर्भ होऊन करून केलेलं आत्मचिंतन. एखाद्या संवेदनशील स्त्रीनं आपल्या जाणत्या सखीला कधी मनोगत तर कधी हृद्‌गत सांगावं, तसा आशय सांगणारा लेखसंग्रह...

गोंदणखुणा

डॉ. प्रिया निघोजकर

किंमत : ₹ ३००/- । (ट.ख. स्वतंत्र)

शब्दांजली

आयुष्याला प्रगल्भपणे सामोरे गेलेल्या एका संवेदनशील मनाच्या समंजस स्त्रीच्या लेखणीतून उतरलेले ललित लेख म्हणजे प्रियदर्शिनी परांजपे यांचा 'शब्दांजली' हा संग्रह होय. यातील हसता हसता नकळत डोळ्यांच्या कडा ओलावणारा 'पु.ल. आणि विनोद' हा लेख येथे दिला आहे.

पु.ल. आणि विनोद

पु.ल. म्हणजेच पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे, पु.ल. हे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व, त्यातून त्यांचा बराच शेवटचा काळ पुण्यातच गेला. म्हणूनच पुणेकरांना त्यांचे विशेष प्रेम! त्यांचा अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून गौरव केला जातो. साहित्य, कला, संगीत, नाट्य, अभिनय, दिग्दर्शन, कथाकथन आणि वक्तृत्व या सगळ्या क्षेत्रांत त्यांचा सहज वावर पाहिला, की अष्टपैलू व्यक्तिमत्त्व ही उपाधी सार्थ वाटते. या व्यतिरिक्त त्यांचा आणखी एक आकर्षित करणारा गुण म्हणजे विनोदी लेखन.

विनोदाची फार मोठी परंपरा आपल्याला श्री. कृ. कोल्हटकरांपासून दिसते. समाजातील विसंगती, त्यांनी व्याजोक्ती, वक्रोक्ती या विनोदाच्या साहाय्याने दाखवून दिल्या. प्रत्येकाच्या विनोदाची तऱ्हा वेगळी! अत्रेंचा विनोद खळाळून हसवणारा, तर पु.लं.चा विनोद हा नर्म विनोद. दुसऱ्याच्या मनाला न दुखावता शाब्दिक कोट्या करून केलेला दिसतो. पु.लं.चा भर गद्य विडंबनावर आधारलेला, तर अत्रेंचा पद्य विडबंनावर अधिक. या सर्व विनोदकारांचा हेतू हा समाज सुधारणेचाच होता.

विनोद हे असे दुधारी शस्त्र आहे, की त्याचा वापर एखाद्याचे दु:ख कमी करण्यासाठी केला जातो, तर कधी एखाद्याचे व्यंग किंवा स्वभाव यावर घणाघाती वार करण्यासाठी केला जातो. विनोदाचे अनेक प्रकार आहेत, जसे नर्म विनोद, शाब्दिक विनोद (शाब्दिक कोट्या), तिरकस विनोद (सर्‌कॅस्टिक), अतिशयोक्तीयुक्त विनोद, स्वभावनिष्ठ विनोद इत्यादी. पु.लं.च्या विनोदाची एक-दोन उदाहरणे पाहू.

एक नवोदित चित्रकार होता. त्याला पु.लं.नी आपली चित्रे पाहावीत असे फार वाटे आणि तसा त्याने आग्रहपण धरला. त्याने मोराची ३०० चित्रे काढली होती. त्यापैकी ८०-९० चित्रे पु.लं.नी पाहावीत, असा त्याचा आग्रह होता. जसे झाडावरचा मोर, पिसारा फुलवलेला मोर, अशा अनेक 'पोझ'मधील मोराची चित्रे जवळ जवळ ५०-५५ पाहून झाल्यावर पु.ल. पटकन खाली खुर्चीत बसले. आणखी चित्रे पाहावीत म्हणून त्या चित्रकाराने आग्रह धरला, तेव्हा ते म्हणाले, ''आता 'नो मोर''' हा झाला शाब्दिक विनोद! ज्यांना 'नो मोर'चा अर्थ कळला त्यांची हसून पुरेवाट झाली. एखाद्याने चिडून ''पुरे, कंटाळा आला, आता नको'' असे म्हणून त्याचे मन दुखावले असते. या उदाहरणावरून दिसते, की शाब्दिक कोटी करून त्या चित्रकाराचे मन न दुखावता आपले मत व्यक्त केले.

स्वभावनिष्ठ विनोद ते कसा करायचे त्याचे उदाहरण पाहा. एकदा एका मालकाने (विसरभोळ्या) नोकराला दुकानातून १ शेर साखर आणि १ तोळा केशर आणण्यास सांगितले. त्या नोकराने स्वभावानुसार दुकानात जाईपर्यंत तो कोणती वस्तू किती आणायची तेच विसरला. मालकाने सांगितलेल्या उलट म्हणजे १ शेर केशर आणि

१ तोळा साखर आणली, हा झाला स्वभावनिष्ठ विनोद.

आता अतिशयोक्तीपूर्ण विनोद पाहू - अतिशयोक्तीचा उपयोग वर्ज्य वस्तूचा गौरव करण्यात केला जातो. तसेच, व्यंग दर्शवण्यातदेखील केला जातो. उदा.. एखादी स्त्री सुंदर नाही, परंतु तिला खूप सुंदर दर्शवण्यासाठीदेखील केला जातो. जसे... जी स्त्री सुंदर नाही, परंतु तिला खूश करण्यासाठी तिचा नवरा अतिशयोक्तीने तिचा उपहास करण्याकरता तिच्या मुखाला चंद्राची, डोळ्यांना कमळाची, आणि गालांना गुलाबाची उपमा देतो. यात कल्पना चमत्कृती तर दिसून येतेच आणि विनोदाची निर्मितीपण होते. पु.लं.चा विनोद हा शाब्दिक विनोद तर होताच, तसेच चमत्कृतिपूर्णही असायचा.

पु.लं.चा आणखी एक शाब्दिक विनोद पाहण्यासारखा आहे. एकदा पु.ल. आजारी होते. त्या वेळी त्यांच्या पत्नीने लवकर बरे व्हावे म्हणून 'रेकी'चा उपचार घ्यावा असा आग्रह धरला. त्याच सुमारास अपॉईंटमेंट घेऊन त्यांच्या चाहत्याबाई

वास्तव, जादुई वास्तव आणि अतिवास्तवाच्या मिश्रणातून आकारलेलं एक धूसर जग. आदिम वासना, भावकल्लोळ व अवलिया पात्रांनी, तसंच प्रत्यक्ष आणि कल्पनेच्या अजब सरमिसळीतून साकारलेली ही अनवट कादंबरी!

खोटं खोटं पण खरं

रवीन्द्र लाखे

किंमत : ₹ २२०/- । (ट.ख. स्वतंत्र)

आयुष्याला प्रगल्भपणे सामोरे गेलेल्या एका संवेदनशील मनाच्या समंजस स्त्रीच्या लेखणीतून उतरलेले हे ललित लेख... जलतरंगांप्रमाणे आपल्याही मनात विचार-भावनांचे तरंग उमटवणारे...!

शब्दांजली

प्रियदर्शिनी परांजपे

किंमत : ₹ १७५/- । (ट.ख. स्वतंत्र)

त्यांना भेटायला आल्या आणि 'रेकी' या ट्रिटमेंटसाठी बोलायला लागल्या. त्या इतका वेळ बोलत होत्या, की पु.लं.ना त्यांना थांबवता आले नाही. शेवटी नाइलाजाने त्यांनी सर्व बोलणे निमूटपणे ऐकून घेतले. त्या बाई दरवाजाबाहेर गेल्यावर भाईंनी म्हणजे पु.लं.नी (सुनिताबाईंना) बायकोला हाक मारून बोलावून घेतले आणि ''ही कसली 'रेकी' ही तर अतिरेकी.'' यात 'रेकी' या शब्दावरची कोटी, त्यांच्या हजरजबाबी स्वभावाची बाजू दिसून येते. हा झाला शाब्दिक विनोद.

विनोद हे दुधारी शस्त्र आहे असे म्हटले तरी, त्यांच्या विनोदाने कुणालाही जखमी केले नाही. कधी गुदगुल्या करत हसवत, क्वचित चिमटे घेतले असतील, परंतु कोणाला दुखावले नाही. त्यांच्या विनोदाने एका डोळ्यात आसू, तर दुसऱ्या डोळ्यात हसू असायचे. अशा पद्धतीने समाजातील विसंगतीवर घणाघाती प्रहार केले.

पु.लं.नी ''माझा हसविण्याचा धंदा'' असे म्हटले असले, तरी मध्यमवर्गीय विसंगती व्याजोक्ती आणि वक्रोक्तीद्वारे समाजाच्या गळी उतरवण्याचा पुरेपूर प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्या व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत महाराष्ट्रात तरी कोणी हात धरू शकत नाही. वरील गुणाव्यतिरिक्त आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे दातृत्व. त्यांनी आयुष्यात मिळवलेला सर्व पैसा वेगवेगळ्या संस्थांना अर्पण केला. 'पु.ल. देशपांडे फाऊंडेशन'तर्फे हा निधी दिला जात असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील माणूसपण आपल्याला दिसून येते ते म्हणजे त्यांनी वेश्यांच्या मुलींसाठी वसतिगृह बांधून दिले. साहित्यिक म्हणून ते परिचित आहेतच, परंतु हा मनाचा मोठेपणा मला खूप भावला. पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर उभारण्यास त्यांचा फार मोठा वाटा आहे. या साऱ्या गोष्टींचा त्यांनी कधी गवगवा केला नाही. दान हे एका हाताने केलेले दुसऱ्या हाताला कळू नये म्हणतात, तसेच त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. म्हणूनच ते महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत ठरले.

❍

मुखपृष्ठाच्या आतील पान, मलपृष्ठ व मलपृष्ठाच्या आतील पानावरील पुस्तकांविषयी...

- इन द नेम ऑफ गॉड — किंमत : ₹ ७५०/-
  मूळ लेखक : रवि सुब्रह्मण्यन
  अनुवाद : शिरीष सहस्रबुद्धे
- बँकांविषयी सर्व काही : भाग १,२,३ — किंमत : ₹ ३५०/- (प्रत्येकी)
  विद्याधर अनास्कर

'राजहंसी' पुस्तकविश्वातील अपडेटसाठी

Website : www.rajhansprakashan.com

इथेही तुम्ही 'राजहंस'ला भेटू शकता...

आमच्या नवनवीन योजनांसाठी बघत राहा
'राजहंस ॲप'

App Store
आयफोन आणि आयपॅडसाठी

Google Play
अँड्रॉइड फोन आणि टॅब्लेटसाठी

राजहंस प्रकाशन

- १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. ✆ २४४६५०६३/२४४७३४५९.
  E-mail : rajhansprakashaneditor@gmail.com | Website : www.rajhansprakashan.com
- राजहंस पुस्तक पेठ, साई सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७च्या सुरुवातीस, परमहंसनगर, वनाजजवळ, पौड रोड, पुणे ४११०३८. ✆ ९३२२६३०७०३.
- शॉप नं. २, सखारामकृपा अपार्टमेंट, अमर हिंद मंडळासमोर, गोखले रोड, दादर (प.), मुंबई ४०००२८. ✆ २४२२३९०१.
- नरेश सबजीवाले, गुलमोहर हॉलसमोर, खामला रोड, नागपूर ४४००२५. ✆ ९३७२२२५२०१.
- राजहंस ग्रंथघर, अप्रुप देशपांडे, १०, शून्य संकुल, सहजीवन कॉलनी, समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर ४३१००१. ✆ ९०९६९४३३६९.
- पंकज क्षेमकल्याणी, २, तळमजला, गुरुपुष्प अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्रामागे, आनंद नगर, (सावरकर नगर), गंगापूर रोड, नाशिक - ४२२०१३. ✆ ९४२२२५२२०८
- अक्षरदालन, निर्मलाय प्लाझा, कोळेकर तिकटी, कोल्हापूर ४१६०१२. ✆ २६४६४२४.
- डॉ. उमेश करंबेळकर, ३२५ मंगळवार पेठ, रघुकुल अपार्टमेंट, सातारा ४१५००२. ✆ २८२५१०.
- मुग्धा शेवाळकर, तळमजला, साईदत्त अपार्टमेंट, सितारा बजाज शोरूमजवळ, शांतीनगर, फोंडा, गोवा ४०३४०१. ✆ ७३९७४६९३९० / ८६०५८९१०१९
- नंदादीप सर्व्हिसेस, २३६/१ साखर पेठ, प्लॉट नं १, नारायण कॉम्प्लेक्स, विणकर बागेसमोर, सोलापूर - ४१३००५ ✆ ९८२२८०७७१५.

मानवी समाजजीवनाचा अविभाज्य
भाग असणाऱ्या बँकिंगक्षेत्राच्या
विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे
आणि बँकेविषयी सामान्य माणसाच्या
मनातील अनेक प्रश्नांची उकल
करणारे मौलिक पुस्तक...
तेही तीन स्वतंत्र भागांत...

बँकांविषयी सर्व काही
भाग १, २, ३
विद्याधर अनास्कर

Registered RNI NO. MAHMAR / 2009 / 33647)
(Published on 15th of every month and posted on 28th of October at S.P. COLLEGE PO, Pune)
Periodical post

प्रेषक : **राजहंस ग्रंथवेध, द्वारा राजहंस प्रकाशन,** १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११०३०. फोन - २४४७३४५९

सदरचे मासिक 'राजहंस' प्रकाशनाच्या वतीने मुद्रक, प्रकाशक रेखा दिलीप माजगावकर यांनी रिच प्रिंट्स, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : डॉ. सदानंद बोरसे